नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५२ * अंक ५१ * * अकोला * शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

### जीएसटीची सूट लाभदायी ठरो

आज जीएसटी म्हणजेच वस्तू, सेवा कराच्या बाबतीत पंतप्रधान मोदी यांनी मोठी घोषणा केल्याने जीएसटी करात बदल होणार आहे. आतापर्यंत पाच टक्के, बारा टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशा चार प्रकारच्या जीएसटीमुळे सर्वांनाच थोडाफार त्रास होत होता. पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकूणच या परिस्थितीवर जनतेला सवलत देण्याचे ठरवल्याने आजच्या बैठकी मुळे वस्तू सेवा करांमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येईल असे वाटते. राहुल गांधी यांनी याबाबत वारंवार टीका केली होती. देशातील सर्वच स्तरांवर या जीएसटीमुळे जो असंतोष होता त्यामुळे त्यात बदल करणे गरजेचे होते. त्यातच आता मतदार याद्यांच्या बाबतीत जो प्रकार झालेला आहे आणि त्यामुळे देशातील वातावरण मोठ्या प्रमाणात बदललेले आहे. त्यामुळे तोडगा म्हणून बरेचसे किंवा विविध बाबतीत वेगवेगळे निर्णय घेण्यात येतील असे दिसते कदाचित त्यापैकी हा एक निर्णय असावा. जीएसटीमुळे त्रस्त झालेल्या अनेकांसाठी हा बदल सुखदायी होईल यात शंका नाही. आज हॉटेलच्या तीनशे रुपयांच्या खोलीसाठी सुद्धा १२% जीएसटी आहे. अशा अनेक गोष्टींवर असलेला हा जीएसटी पाच टक्केवर येणार की, १८ टक्क्यांवर जाणार याबाबतीत संभ्रम निर्माण होऊ शकतो. आता ज्या चैनीच्या वस्तूंवर म्हणजेच महागड्या गाड्या वगैरेवर २८% वस्तू सेवा कर आहे तो कर १८% होणार आहे म्हणजेच श्रीमंतांना बरीच मोठी सूट मिळणार आहे. ५० लाख, ७० लाख ते एक करोडच्या गाडीवर जो कर आहे तो जवळजवळ दहा टक्क्यांनी कमी होणार आहे. म्हणजेच या जीएसटी कपातीचा मोठ्या खरेदीदारांना किंवा मोठी खरेदी करणाऱ्या मोठ्या लोकांना बराच मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या जीएसटीचे उत्पन्न अत्यंत मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे त्यामुळे पुढे कमी होणाऱ्या जीएसटी चा फायदा सर्वसामान्यांनाही मिळावा अशी साधीसुधी अपेक्षा असली. तरी पुढे त्याबाबतीत काय निर्णय होतील, हे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या निर्णय आणि समन्वयावर अवलंबून आहे. आपल्याला गेल्या अनेक वर्षांमध्ये अशा प्रकारची सुखद बातमी पहिल्यांदाच मिळणार आहे. देशातील कोणतीही वस्तू जीएसटी शिवाय मिळत नाही आता तरी सरकारने काही वस्तू वरील जीएसटी रद्द केला तर सामान्यांवर सरकारचे उपकार होतील. तरीही आज सरकारने जो सकारात्मक निर्णयाचा इरादा जाहीर केला आहे त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरील भाषण कारणीभूत आहे. त्या १०३ मिनिटांच्या अत्यंत तेजस्वी भाषणात अनेक बाबींचा त्यांनी उहापोह केला पण त्यामध्ये सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न जीएसटीचा होता आणि तो आता जवळजवळ जनहितार्थ निर्णय होणार आहे. जर खरोखरच असे असेल तर हा अत्यंत खुशीचा मामला आहे. याबद्दल केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे अभिनंदन केलेच पाहिजे.


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# जीएसटीच्या ५% आणि १८% स्लॅबला अखेर मंत्रीगटाची मान्यता

## यापुढे ४ ऐवजी २ स्लॅब : दैनंदिन वापराच्या वस्तू स्वस्त होणार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** जीएसटी परिषदेच्या मंत्र्यांच्या गटाने जीएसटीच्या ५% आणि १८% स्लॅबना मान्यता दिली आहे. लक्झरी वस्तू ४०% च्या ब्रॅकेटमध्ये येतील. जीओएमचे संयोजक सम्राट चौधरी यांनी ही माहिती दिली. सध्या जीएसटीचे ५%, १२%, १८% आणि २८% असे ४ स्लॅब आहेत.

बैठकीबद्दल, त्याचे निमंत्रक सम्राट चौधरी म्हणाले, आम्ही केंद्र सरकारच्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे, जो १२% आणि २८% च्या जीएसटी स्लॅब रद्द करण्याबद्दल बोलतो. केंद्राच्या प्रस्तावांवर सर्वांनी आपापल्या सूचना दिल्या. काही राज्यांनीही काही आक्षेप घेतले. ते जीएसटी कौन्सिलकडे पाठवण्यात आले आहे जे त्यावर निर्णय घेईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून सांगितले होते की, यावर्षी दिवाळीत एक मोठी भेट मिळणार आहे. आम्ही पुढच्या पिढीतील जीएसटी सुधारणा आणत आहोत. सामान्य लोकांसाठी कर कमी होतील, दैनंदिन वस्तू स्वस्त होतील, लोकांना खूप फायदा होईल.

सुका मेवा, ब्रँडेड नमकीन, टूथ पावडर, टूथपेस्ट, साबण, केसांचे तेल, सामान्य प्रतिजैविक, वेदनाशामक औषधे, प्रक्रिया केलेले अन्न, स्नॅक्स, गोठवलेल्या भाज्या, कंडेन्स्ड मिल्क, काही मोबाईल, काही संगणक, शिलाई मशीन, प्रेशर कुकर, गीझर यासारख्या वस्तूंवरचा कर १२% वरून ५% पर्यंत कमी केला जाणार असल्याने त्या स्वस्त होतील.

याशिवाय, नॉन-इलेक्ट्रिक वॉटर फिल्टर, इलेक्ट्रिक इस्त्री, व्हॅक्यूम क्लीनर, १,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे तयार कपडे, शूज, बहुतेक लसी, एचआयव्ही/टीबी डायग्नोस्टिक किट, सायकली आणि भांडी यावरही कमी दराने कर आकारला जाईल.

## इंडिया आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डींचा अर्ज सादर



उपराष्ट्रपती निवडणूक

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :** विरोधी आघाडी इंडियाचे उपराष्ट्रपती पदाचे उमेदवार, निवृत्त सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी गुरुवारी आपला अर्ज दाखल केला. खरगे यांच्यासह २० नेते प्रस्तावक झाले. नामांकनाच्या वेळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सोनिया गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) प्रमुख शरद पवार यांच्यासह अनेक मोठे नेते उपस्थित होते.

नामांकन दाखल करण्यापूर्वी रेड्डी यांनी संसदेच्या आवारातील प्रेरणा स्थळावर महात्मा गांधींना पुष्पांजली वाहिली. नामांकन दाखल केल्यानंतर बी. सुदर्शन रेड्डी म्हणाले की, ही निवडणूक केवळ एका व्यक्तीची निवडणूक नाही तर भारताच्या कल्पनेशी जोडलेली आहे जिथे संसद प्रामाणिकपणे काम करते, मतभेदांचा आदर केला जातो आणि संस्था स्वातंत्र्य आणि निष्पक्षतेने लोकांची सेवा करतात. रेड्डी पुढे म्हणाले की, जर ते निवडून आले तर ते उपराष्ट्रपती पदाचे काम निष्पक्षता, सन्मान, संवाद आणि सौजन्याने पार पाडतील.

## भारत-पाकिस्तान सामना होणार

### आशिया कप स्पर्धा




■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** ९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारत सरकारने गुरुवारी यासाठी परवानगी दिली आहे.

सरकारने सांगितले, बहुराष्ट्रीय स्पर्धेत पाकिस्तानसोबत खेळण्यास कोणतीही बंदी नाही. आमचा संघ ना पाकिस्तानात खेळण्यासाठी जाणार आहे, ना आम्ही त्यांना भारतात खेळण्यासाठी येऊ देणार आहोत.

क्रीडा मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने एक पत्र शेअर केले, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारताचे धोरण स्पष्ट केले होते. तथापि, आंतरराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारत आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनांचे नियम आणि त्यांच्या खेळाडूंचे हित लक्षात घेऊन निर्णय घेईल. भारतीय संघ त्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होतील ज्यामध्ये पाक संघ आणि खेळाडू देखील सहभागी होतील.

## उपराष्ट्रपती निवडणुकीसाठी भाजपची रणनीती

### सीएम फडणवीसांचा शरद पवार, उद्धव ठाकरेंना फोन : राधाकृष्णनांसाठी मागितला पाठिंबा



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** देशाच्या राजकारणात उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीची चर्चा सुरू झाली आहे. या निवडणुकीसाठी भाजपप्रणीत एनडीएने महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे, इंडिया आघाडीनेही सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना रिंगणात उतरवले आहे.

ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी भाजप सक्रिय असून, त्याचाच भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधी पक्षांतील प्रमुख नेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना फोन करून एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची विनंती केली आहे.

उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी भाजपच्या वतीने देवेंद्र फडणवीस यांच्यावर महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांशी संवाद साधण्याची मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे. याच अनुषंगाने, त्यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना फोन करून एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा देण्याचे आवाहन केले. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल असल्याने उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीत तुमचाही पाठिंबा हवाय, अशी विनंती फडणवीसांनी केल्याचे समजते. खासदार संजय राऊत यांनीही यास दुजोरा दिला आहे.

मात्र, देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना फोन केल्याचे कुठलेही वृत्त नाही. त्यामुळे, फडणवीसांनी ठाकरे आणि पवारांना पाठिंबा मागितला आहे.

बी. सुदर्शन रेड्डी यांचा अर्ज भरतेवेळी शरद पवार हे उपस्थित होते. याबाबत त्यांनी ट्विट करून माहिती दिली आहे. लढाई संविधान आणि लोकशाही बळकटीकरणाची आहे, लोकशाही मूल्यांवर गाढा विश्वास असणारे रेड्डी त्या विश्वासाला सार्थ ठरवतील," असे पवार यांनी म्हटले आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे

## गुरूवारी वाजले सूप

### २१ बैठका : ऑपरेशन सिंदूरवर १६ तास चर्चा : जगदीप धनखड यांचा राजीनामा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २१ :** संसदेचे पावसाळी अधिवेशन गुरूवार २१ ऑगस्ट रोजी संपले. हे अधिवेशन २१ जुलै रोजी सुरू झाले. संपूर्ण अधिवेशनात एकूण २१ बैठका झाल्या. लोकसभेत चर्चेसाठी १२० तास-ांचा वेळ देण्यात आला होता, परंतु त्यावर फक्त ३७ तास चर्चा झाली. राज्यसभेत ४१ तास चर्चा झाली.

या काळात लोकसभेत १२ आणि राज्यसभेत १५ विधेयके मंजूर झाली. सर्वात जास्त चर्चेत आलेले विधेयक म्हणजे अटक केलेले सीएम, पीएम आणि मंत्र्यांना काढून टाकणारे घटना दुरुस्ती विधेयक. ते जेपीसीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

राज्यसभेचे उपसभापती जगदीप धनखड यांनी सत्राच्या मध्यातच राजीनामा दिल्याने अधिवेशनाची सुरुवात झाली. संपूर्ण अधिवेशनात विरोधकांनी गोंधळ घातला आणि बिहारवरील विशेष सघन सुधारणावर चर्चा करण्याची मागणी करत निषेध केला, ज्यामुळे कामकाज होऊ शकले नाही.

२८ आणि २९ जुलै रोजी ऑपरेशन सिंदूरवर एक विशेष चर्चा झाली, जी पंतप्रधान मोदींच्या उत्तराने संपली. १८ ऑगस्ट रोजी देशाच्या यशस्वी अंतराळ कार्यक्रमातील कामगिरीवर एक विशेष चर्चा सुरू झाली, परंतु ती अनिर्णीत राहिली. लोकसभेत ४१९ प्रश्न अजेंड्यावर ठेवण्यात आले होते, परंतु विरोधकांच्या गदारोळामुळे केवळ ५५ प्रश्नांची उत्तरे मिळू शकली. तर राज्यसभेत २८५ प्रश्न अजेंड्यावर ठेवण्यात आले होते, परंतु केवळ १४ प्रश्नांची उत्तरे मिळू शकली.

## आसाममध्ये १८+ वयाच्या लोकांचे आधार कार्ड बनवले जाणार नाही

■ **वृत्तसंस्था, दिसपूर, दि. २१ :** आसाममध्ये १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी नवीन आधार कार्ड बनवले जाणार नाहीत. मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी गुरुवारी सांगितले, बेकायदेशीर स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व मिळण्यापासून रोखण्यासाठी मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री हिमंता म्हणाले की, राज्यातील १८ वर्षांवरील ज्या व्यक्तींकडे अद्याप आधार कार्ड नाही, त्यांना अर्ज करण्यासाठी फक्त एक महिना दिला जाईल. त्याच वेळी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि चहा जमातीतील लोकांना एक वर्षासाठी आधार कार्ड मिळू शकेल. आसाम मंत्रिमंडळाची बैठक गुरुवारी मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

ऑक्टोबरमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने नागरिकत्व कायद्याच्या कलम ६ अ ची वैधता कायम ठेवली. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ५ न्यायाधीशांच्या घटनापीठाने यावर निकाल दिला. तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्यासह चार न्यायाधीशांनी या निर्णयाला सहमती दर्शवली होती. न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला यांनी असहमती दर्शविली. प्रत्यक्षात, नागरिकत्व कायद्यातील कलम ६अ १९८५ मध्ये आसाम करारादरम्यान जोडण्यात आले होते. या कायद्यानुसार, १ जानेवारी १९६६ ते २५ मार्च १९७१ दरम्यान आसाममध्ये आलेले बांगलादेशी स्थलांतरित स्वतःला भारतीय नागरिक म्हणून नोंदणी करू शकतात.

## यंदा ५ दिवस आधीच खात्यात पगार जमा

### राज्य शासनाचा निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :** राज्यातील शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्त वेतनधारकांसाठी सरकारने आनंदाची बातमी दिली आहे. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ऑगस्ट महिन्याचा पगार पाच दिवस आधीच देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे १ सप्टेंबरला येणारा नियमित पगार २६ ऑगस्ट रोजी संबंधितांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवात अतिरिक्त खचार्चा भार न पडावा आणि सण साजरा करताना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. याचा लाभ जिल्हा परिषद कर्मचारी, मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थांचे कर्मचारी, कृषी व अकृषी विद्यापीठांमधील अधिकारी, अशासकीय महाविद्यालये, तसेच निवृत्त वेतनधारक व कुटुंब निवृत्त वेतनधारक यांनाही मिळणार आहे.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या शेवटच्या पाच दिवसांमध्ये गणेश मंडळांना रात्री १२ वाजेपर्यंत देखावे सादर करण्याची मुभा दिली जाणार आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी कराड येथे ही माहिती दिली असून, यासंदर्भातील अधिकृत आदेश लवकरच मुख्यमंत्री जाहीर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गणेशभक्तांसाठी मोठा दिलासा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टोलमाफीचा निर्णय घेतला आहे. २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या कालावधीत मुंबई-बेंगळुरू व मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच अन्य रस्त्यांवर ही टोलमाफी लागू राहणार आहे.

बेस्टचा निवडणुकीत पानिपत...

## राज-फडणवीस भेटीची चर्चा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आज सकाळी अचानक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचले. सकाळी ९ च्या सुमारास राज ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी पोहोचले.

ही बातमी समोर येताच विविध अंदाज, तर्क-वितर्क सुरु झाले. कालच बेस्टच्या पतपेढीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकीकडे राजकीय जाणकारांच लक्ष लागलं होतं. कारण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन ही निवडणूक लढवलेली.

सध्या मनसे आणि उद्धव ठाकरे गटाची युती होणार अशी चर्चा आहे. मुंबई महानगरपालिकेची निवडणूक दोन्ही पक्ष एकत्र लढवणार अशी शक्यता आहे. त्याआधी बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळे छोटी लिटमस टेस्ट म्हणून या निवडणूक निकालाकडे सगळे पाहत होते.

प्रत्यक्षात निकाल आला, तो दोन्ही ठाकरे बंधुंसाठी मोठा झटका आहे. कारण त्यांना बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत भोपळाही फोडता आला नाही. आज निकालाच्या दुसऱ्या दिवशी राज ठाकरे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीसाठी पोहोचले. त्यामुळे राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरु झाल्या.

मनसे उद्धव ठाकरे गटासोबत युती करणार नाही का? मनसे महायुतीमध्ये सहभागी होणार का? असे विविध अंदाज सुरु होते. राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात जवळपास ५० मिनिटं चर्चा झाली. या बैठकीनंतर शिवतीर्थवर येऊन राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी मुख्यमंत्र्यांना आपण का भेटलो ? त्यामागच कारण स्पष्ट केलं.

मला टाऊन प्लानिंगच्या विषयाची आवड आहे. त्याचा आराखडा कसा करता येईल यावर चर्चा होती. मी जे सांगतो त्यात तुम्हाला इंटरेस्ट नाही. त्यामुळे सांगणं गरजेचं आहे. नाही तर लोकांची मते घेत बसाल, असं राज ठाकरे म्हणाले.

मुंबईत सध्या पार्किंगचा मुद्दा गंभीर बनत चालला आहे. या पार्किंगच्या मुद्यावर मार्ग काढण्यासाठी राज ठाकरे मुख्यमंत्र्यांना भेटले.

## हजारावर महिला कर्मचाऱ्यांनी लाटले पैसे

### लाडकी बहीण योजनेचा गैरलाभ ■ सरकारकडून कारवाईची तयारी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :** आर्थिकदृष्ट्या गरीब आणि गरजू महिलांसाठी असलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा राज्यातील ११८३ जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनी गैरप्रकारे लाभ घेतल्याचे उघड झाले आहे.

याप्रकरणी अशा कर्मचाऱ्यांवर आता कारवाईची टांगती तलवार आहे. या योजनेचा गैरलाभ घेणाऱ्यांमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील सरकारी महिला कर्मचाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे.

माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या प्रकरणात सर्वाधिक महिला कर्मचारी बुलढाणा जिल्ह्यात असून त्यांची संख्या १९३ आहे. त्याखालोखाल सोलापूर (१५०), लातूर (१४७), बीड (१४५) आणि उस्मानाबाद (११०) जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. पुणे (५४), कोल्हापूर (२४), अहमदनगर आणि सांगली (१७) तसेच नागपूर (११) जिल्ह्यांमध्येही अशाच महिला कर्मचाऱ्यांनी योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले आहे. काही जिल्ह्यांमध्ये ही संख्या अगदी एक किंवा दोन एवढीच आहे.

**नोटीस बजावून कारवाई**

आर्थिक निकषावर आणि अटीवर महिलेला या योजनेचा लाभ घेता येतो. परंतु शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी देखील प्रशासनाची दिशाभूल करत या योजनेचा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

याबाबतचे पत्र बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना प्राप्त झाले असून त्यानुसार संबंधित महिला कर्मचाऱ्याला नोटीस बजावून कारवाई केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या सिओंनी दिली आहे.

**गैरलाभ घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| बुलढाणा | १९३ | अमरावती | १० |
| सोलापूर | १५० | छत्रपती संभाजीनगर, नाशिक | ९ |
| लातूर | १४७ | सातारा, नांदेड, नंदुरबार | ८ |
| बीड | १४५ | जळगाव, गोंदिया | ७ |
| उस्मानाबाद | ११० | चंद्रपूर, धुळे, भंडारा | ५ |
| जालना | ७६ | परभणी | ३ |
| वाशीम | ५६ | गडचिरोली, यवतमाळ, ठाणे, हिंगोली | २ |
| पुणे | ५४ | अकोला, सिंधुदुर्ग, मुंबई, रत्नागिरी | १ |
| कोल्हापूर | २४ | | |
| सांगली, अहमदनगर | १७ | | |
| नागपूर | ११ | | |

**२६ लाख महिलांची चौकशी सुरू**

'लाडकी बहीण' योजनेच्या नियमांनुसार, एका घरात दोनपेक्षा अधिक महिलांना लाभ घेता येत नाही. मात्र, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल २६ लाख महिलांची यादी महिला व बालकल्याण विभागाने तयार केली आहे. आता या महिलांची चौकशी सुरू झाली असून, यातून लाखो महिलांना योजनेतून वगळले जाण्याची शक्यता आहे.

सध्या राज्यात २ कोटी २९ लाख महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. मात्र, या पडताळणी प्रक्रियेनंतर लाभार्थींची संख्या कमी होण्याची शक्यता आहे. यात शासकीय महिला कर्मचारीही अपात्र ठरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# धनंजय मुंडेंनी कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची फाइल गायब केली



## अंजली दमानियांचा आरोप

**मुंबई :** धनंजय मुंडे यांनी कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची आणि गौडबंगालाची फाइल गायब केली आहे, असा आरोप आज सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. त्यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातल्या कृषी विभागतला घोटाळा आणि आरोप चर्चेत आलेत. कृषी सचिव व्ही. राधा यांनी मंत्र्यांना कृषी विभागातल्या भ्रष्टाचाराची फाइल पाठवली होती. हीच फाइल धनंजय मुंडे यांनी गायब केल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केलाय. दमानिया यांच्या आरोपावर धनंजय मुंडे यांची प्रतिक्रिया अद्याप तरी आलेली नाही. अंजली दमानिया यांनी 'एक्स'वर एक पोस्ट केली आहे. त्यात त्या म्हणतात की, 'मॅडम व्ही. राधा या कृषी सचिव असताना, कृषी विभागात झालेल्या भ्रष्टाचाराच्या आणि गौडबंगालाच्या रिपोर्टची फाइल मंत्र्यांना पाठवली. ही फाइल धनंजय मुंडे यांनी गायब केली. आज लोकायुक्तांच्या सुनावणी दरम्यान, मी हे लोकायुक्तांपुढे मांडल्यानंतर, प्रतिभा पाटील नावाच्या उपसचिवांनी लोकायुक्तांना कन्फर्म केले, की ही फाइल मंत्र्यांना दिल्याचा जावक क्रमांक नाही.

### भाजपचा तंत्रज्ञानाच्या मदतीने लोकशाहीवर हल्ला

# आमदार जितेंद्र आव्हाड यांचा आरोप



**मुंबई :** महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी तंत्रज्ञानाच्या पद्धतीने लोकशाहीवर पद्धतशीर हल्ला केला. मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर भाजपला सोयीचे बदल करण्यात आले, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) ज्येष्ठ नेते, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १९ ऑक्टोबर रोजी महाविकास आघाडीकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला आणि राज्य निवडणूक आयोगाला निवेदन देण्यात आले आहे. त्या निवेदनाचा हवाला देत आव्हाड यांनी निवडणूक आयोगावर आयोगावर पुन्हा आरोप केले आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत जे घडले, ते केवळ निवडणुकीतील गैरप्रकार नव्हते, तर लोकशाही व्यवस्थेवर तंत्रज्ञानाच्या मदतीने पद्धतशीरपणे चढवलेला हल्ला होता. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी, मतदान सुरू होण्यापूर्वीच महाविकास आघाडीने निवडणूक आयोगाला औपचारिकपणे भाजप अनेक मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात मतदार याद्यांमध्ये फेरफार करत असल्याबद्दल सतर्क केले होते.

# पुणे ते कोल्हापूर महामार्गावर टोलवसुली बंद करा : राजू शेट्टी



**कोल्हापूरः** स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर पुण्यापासून कोल्हापूर आणि कागल ते बेळगाव हद्दीत टोल वसुली बंद करण्यासाठी कायदेशीर नोटीस राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला पाठवली आहे. येत्या आठवडाभरात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याबाबत कार्यवाही न केल्यास पुढील आठवड्यात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे. राजू शेट्टी म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पुणे ते कोल्हापूर व कागल ते बेळगाव या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावर वाहनधारकाकडून टोल वसूली करता येणार नाही. काल याबाबत मी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना तातडीने या दोन्ही महामार्गावरील टोल बंद करण्यात यावे याबाबत कायदेशीर मार्गाने नोटीस दिली आहे. येत्या आठवड्याभरात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने याबाबत कार्यवाही न केल्यास पुढील आठवड्यात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे शेट्टी यांनी म्हटले आहे. दरम्यान, केरळमधील पलियाक्कारा टोल नाक्यावरील टोलवसुली स्थगित करण्याच्या केरळ उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.

# रायगडमध्ये उरणजवळ मासेमारी बोट समुद्रात बुडाली

**मुंबई :** गेल्या तीन दिवसांपासून मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे समुद्राला उधाण आले असताना, आज सकाळी उरणजवळ एक मासेमारी बोट बुडाल्याची घटना घडली आहे. आज सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास करंजा रिप्स परिसरात ही दुर्घटना घडली. ही बोट गुजरातच्या हद्दीतील मच्छिमारांची असल्याचे सांगितले जात आहे. समुद्रातील पाण्याचा जोरदार प्रवाह बोटीत शिरल्याने ही बोट थेट बुडाल्याचे म्हटले जात आहे. या बोटीत सात खलाशी असून सर्वांना सुखरूप वाचवण्यात यश आले आहे. हेलिकॉप्टरच्या मदतीने युद्धपातळीवर बचावकार्य राबवून या खलाशांना वाचवण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच सीआयएसएफ, आणि नौदालाच्या गस्त नौकाद्वारे बचावकार्य करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र भारतीय नौदलाने अद्याप या घटनेबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही.

# जीएसटी भवनच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :

वडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या जीएसटी भवनच्या चार पैकी पहिल्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या इमारतीमध्ये मुंबईमधील भाड्याच्या जागेमध्ये असलेली शासकीय कार्यालये स्थलांतरित करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचना

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती कक्षामध्ये जीएसटी भवन येथे विविध शासकीय कार्यालयांना जागा वाटप करण्याविषयी बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जीएसटी आयुक्त आशिष शर्मा यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जीएसटी भवनची इमारत कार्पोरेट धर्तीवर तयार करावी असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, या इमारतीमध्ये शासकीय कार्यालयांना जागा देताना नियमाप्रमाणे जागेचे वाटप करण्यात यावे. सध्या भाड्याच्या जागेमध्ये असलेल्या कार्यालयांच्या जागेची माहिती घेऊन जागा वाटप करावी. जागेचे वाटप झाल्यानंतर शिल्लक राहणारी जागा खासगी कंपन्यांना भाड्याने देण्याबाबत प्रस्ताव करावा. शासकीय कार्यालयांना जागा वाटपासाठी अपर मुख्य सचिव वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जीएसटी आयुक्त यांची संयुक्त समिती स्थापन करावी,अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. वडाळा येथील जीएसटी भवन या इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या .हजार चौ. फूट जागेमध्ये शासनाची कार्यालये असणार आहेत.

### मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्गावर गणेशोत्सवादरम्यान

# जड वाहनांना वाहतूक बंदी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

गणेशोत्सवासाठी मुतींर्चे आगमन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास आदींसाठी सार्वजनिक हितास्तव मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 66 वर वजनक्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त वाहनांना मोटार वाहन अधिनियम 1988 च्या कलम 155 मधील तरतूदीनुसार वाहतूक बंदी करण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास म्हणून 23 ऑगस्ट रोजी मध्यरात्री 12 वाजेपासून ते 28 ऑगस्ट रोजी रात्री 11 वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहनांना वाहतूक बंदी असणार आहे. यामध्ये अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी आदी वाहनांचा समावेश आहे.

तसेच 5 व 7 दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन आणि परतीच्या प्रवासासाठी 31 ऑगस्ट आणि 2 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपासून रात्री 11 वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी 11 दिवसांचे गणपती विसर्जन, परतीचा प्रवासाकरिता 6 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपासून ते 7 सप्टेंबर 2025 रोजी रात्री 8 वाजेपर्यंत या कालावधीत जड वाहतूकीस बंदी राहील. महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना 28 ऑगस्ट रोजी रात्री 11 वाजेपासून ते 31 ऑगस्ट रोजी सकाळी 8 वाजेपर्यंत, 31 ऑगस्ट रोजी रात्री 11 वाजेपासून ते 2 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपर्यंत आणि सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजेपासून ते 6 सप्टेंबर रोजी सकाळी 8 वाजेपर्यंत वाहतूकीस परवानगी राहील. तसेच सर्व वाहनांना 7 सप्टेंबर रोजी रात्री 8 वाजेनंतर नियमित वाहतूकीस परवानगी असेल.

हे निर्बंध जेएनपीटी बंदर ते जयगड बंदर येथून आयात- निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने, दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, औषधे, लिक्वीड मेडीकल ऑक्सिजन, अन्न धान्य, भाजीपाला व नाशवंत माल आदी जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई -गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 च्या रस्ता रूंदीकरण, रस्ता दुरूस्ती कामकाज आणि साहित्य, माल ने - आण करणाऱ्या वाहनांनाही ही बंदी लागू राहणार नाही. यासंदर्भात वाहतूकदारांना संबंधित वाहतूक विभाग, महामार्ग पोलीस यांनी प्रवेशपत्र देण्याची कार्यवाही करावी.

कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांचा आणि महामार्गांचा विचार करून पोलीस आयुक्त, नवी मुंबई आणि संबंधीत जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांनी जड, अवजड वाहनांवरील वाहतुकीचे निर्बंध शिथील करण्याबाबत प्राप्त परिस्थितीनुसार आपले स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. तसेच जेएनपीटी व जयगड बंदरातून आयात - निर्यात मालाची वाहतूक सुरू राहील, याकरिता वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे, असे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी आदेशात नमूद आहे.

# अमेरिकेने लादलेल्या टॅरिफला इष्टापत्तीत परावर्तित करणार : मुख्यमंत्री

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :



अमेरिकेने भारतातून आयात होणाऱ्या मालावर टॅरीफ लावून भारताला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारत अमेरिकेने निर्माण केलेल्या आव्हानांना न घाबरता आपली पावले टाकत आहे. आपल्या मालासाठी पर्यायी बाजारपेठ शोधून अमेरिकेने लादलेल्या टॅरीफला इष्टापत्तीत परावर्तित करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले.

या आपत्तीला संधी मानून राज्याच्या इज ऑफ डूईंग बिझनेस मध्ये १०० बदल करण्यात यावेत. इज ऑफ डूइंग बिजनेस धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र वॉर रूम ची निर्मिती करण्यात यावी, असे आदेशही फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे जागतिक आयात निर्यात धोरणाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाय योजनांबाबत आयोजित बैठकीत फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, इज ऑफ डूईंग बिझनेस साठी निर्माण करण्यात येणाऱ्या वॉर रूमचा दर महिन्याला आढावाही घेण्यात येईल. राज्यामध्ये खाजगी औद्योगिक पार्कसाठी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात यावे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ औद्योगिक वसाहतींच्या बाहेर असे औद्योगिक पार्क विकसित करण्यासाठी स्पष्ट धोरण आणावे. यामध्ये लघु आणि मध्यम उद्योगांचा प्राधान्याने अंतर्भाव असावा. त्यातून उद्योजकांना उद्योगासाठी लागणारे परवाने तातडीने मिळतील.

# 'अंधत्व मुक्त महाराष्ट्र'च्या मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेला 'दृष्टी यज्ञ'च्या माध्यमातून बळ

## आतापर्यंत १,८०० शाळांमधील ७.५ लाख विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

अंधत्व मुक्त महाराष्ट्र करणे हे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. शासनामार्फत याबाबत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांच्या नेत्र तपासणीसाठी एप्रिल २०१९ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासन, वनसाईट एसीलर लक्सोटिका फाउंडेशन आणि रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यात करार करण्यात आला असून आतापर्यंत १९ जिल्ह्यांच्या १८०० शाळांमधील ७.५ लाख विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली आहे.




शालेय विद्यार्थ्यांमध्ये दृष्टीदोष असल्यास त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होऊन त्यांच्या शैक्षणिक वाटचालीवर त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो. यामुळे मुख्यमंत्र्यांच्या पुढाकारातून शासनाने नेत्र तपासणी आणि चष्मे बनविणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या कंपन्यांपैकी असलेल्या एसीलर लक्सोटिका सोबत भागीदारी करार केला. यानुसार २५ लाख शालेय विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करून विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार मोफत चष्मे देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत तपासणी झालेल्या आणि चष्म्याची आवश्यकता असलेल्या ४२,७६२ विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेच्या चष्म्यांचे वाटप करण्यात आले आहे.

या मोहिमेच्या माध्यमातून शहरांबरोबरच दुर्गम, ग्रामीण आणि आदिवासी शाळांतील विद्यार्थ्यांची देखील नेत्र तपासणी करण्यात येत आहे. 'दृष्टी यज्ञ - युनिव्हर्सल स्कूल आय हेल्थ प्रोग्राम' ही अशी योजना आहे ज्यामधून धूसर दृष्टीमुळे कोणत्याही मुलाचे शिक्षण बंद पडू नये याची दक्षता घेतली जाते. या माध्यमातून राज्यातील हजारो मुलांचे जीवन बदलत आहे.

महाराष्ट्रातील २५ लाख शालेय विद्यार्थ्यांची सखोल नेत्र तपासणी करून दृष्टी दोष असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. यातील पहिल्या टप्प्यात विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी झालेल्या जिल्ह्यांमध्ये मुंबईसह ठाणे, पालघर, सातारा, नाशिक, पुणे, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, सांगली, बीड, कोल्हापूर, चंद्रपूर, सोलापूर, अकोला, धुळे, जालना, बुलढाणा, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील शाळांचा समावेश आहे.

गजबजलेल्या महानगरांपासून दुर्गम आदिवासी खेड्यांपर्यंत, या मोहिमेच्या माध्यमातून अशा शाळांपर्यंत पोहोच साधली आहे जिथे विद्यार्थ्यांना पूर्वी फळा स्पष्ट पाहण्यात अडचण येत होती. मोबाईल तपासणी युनिट्स, कुशल पथके आणि जागतिक दर्जाच्या एसीलर लक्सोटिका लेन्स यांनी धूसर दृष्टीची जागा स्पष्टता आणि नवीन आशेने घेतली आहे.

# पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २१ :

राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा सिलसिला सुरूच आहे. नुकत्याच झालेल्या बदल्यांमध्ये सात अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये डॉ. अशोक करंजकर यांची उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती झाली आहे, तर संजय कोलते यांची मुंबईतील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, आता आणखी पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, योगेश कुंभेजकर यांना वाशिम जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्त करण्यात आले आहे.

राज्यात पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. या बदल्यांनुसार वाशिम, अकोला आणि परभणी जिल्ह्यांना नवे जिल्हाधिकारी मिळाले आहेत. योगेश कुंभेजकर यांची वाशिमचे, वर्षा मीना यांची अकोल्याचे आणि संजय चव्हाण यांची परभणीचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), अकोला येथे भुवनेश्वरी एस. यांची व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, रघुनाथ गावडे यांची मुंबईच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्क नियंत्रक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे यांची दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून बदली झाल्यानंतर रिक्त झालेल्या असंघटीत कामगार विकास आयुक्तपदी काही दिवसांपूर्वी सुशील खोडवेकर यांची नियुक्ती करण्यात आली. तर, तुकाराम मुंढेंना दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**या पाच अधिकाऱ्यांचा झाल्या बदल्या**

1. योगेश कुंभेजकर यांची वाशिमचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
2. रघुनाथ गावडे यांची मुंबईच्या अतिरिक्त मुद्रांक शुल्क नियंत्रक म्हणून नियुक्ती.
3. संजय चव्हाण यांची परभणीच्या जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती.
4. भुवनेश्वरी एस.यांची महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ (महाबीज), अकोलाच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती.
5. वर्षा मीना यांची अकोलाच्या जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती.

# पुणे घाट परिसराला ऑरेंज अलर्ट

**मुंबईः** राज्यात पुढील २४ तासासाठी पुणे घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून भारतीय हवामान विभाग आणि राष्ट्रीय रिमोट सेन्सिंग केंद्र या केंद्रीय संस्था सोबत सतत संपर्क साधून पुढील हवामानाच्या अंदाजाची माहिती घेऊन सर्व जिल्ह्यांना प्रसारित करण्यात येत आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून वापर करून मागील ७ दिवसात हवामानाचे २३९ अलर्ट २५३.७४ कोटी नागरिकांपर्यंत रटर च्या माध्यमातून पोहचवण्यात आले आहेत. संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनास सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

# अतिवृष्टीमुळे गणेशोत्सव मंडपांचेही नुकसान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २१ :

मुंबईत मागील दोन दिवसात झालेल्या पावसामुळे अनेक गणेशोत्सव मंडळांच्या परिसरात पाणी साचले होते. पाण्याचा निचरा झाल्यांनतर आता त्याठिकाणी चिखल झालेला आहे.

त्यामुळे डासांची उत्पत्ती आणि साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव होऊ नयेत यासाठी महापालिकेने तातडीने संबंधित ठिकाणी धूर आणि औषध फवारणी करावी, अशी मागणी बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

मुंबईत नुकतेच अनेक सार्वजनिक मंडळांच्या गणेशमूतीर्चे मंडपातून आगमन झाले. मात्र, पावसामुळे मंडपाच्या ठिकाणी पाणी साचले असून चिखल झाला आहे.

यामुळे येथे डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता आहे, असे बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी सांगितले. पालिकेने ही बाब लक्षात घेऊन तातडीने धूर फवारणी आणि साथरोग प्रतिबंधात्मक औषध फवारणी करावी, अशी मागणी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे केली आहे.

# स्कुल व्हॅन नियमावली अंतिम करून अधिसूचना जारी करावी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :

विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन नियमावली आणण्यात येत आहे. ही नियमावली अंतिम करून याबाबत तातडीने अधिसूचना जारी करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत स्कूल व्हॅन बाबत सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी परिवहन मंत्री बोलत होते. बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकार, सह परिवहन आयुक्त जयंत पाटील आदी उपस्थित होते. सेवानिवृत्त अतिरिक्त परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील यांनी सादरीकरण केले. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त असलेली अधिकृत स्कूल व्हॅन विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी आधीच्या नियमात बदल करण्यात येऊन नियमावली सुटसुटीत करावी. स्कूल व्हॅनचे भाडे मासिक तत्वावर आणि वर्षाच्या १० महिने कालावधीपर्यंतच घेण्याबाबत बंधन असावे. नियमावलीमध्ये परिवहन समित्यांचे सक्षमीकरण, महिन्यातून एकदा समितीची बैठक होणे, प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नोडल अधिकारी नेमणे अंतर्भूत असावे.




## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडड्र्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४ ) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. वाहने इर-श्क या श्रेणीतील असतील. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश आहे, असेही परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थ्यांसाठी अनेकदा अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते.

# सिमाऐं सिर्फ दिमाग में होती है, उम्र में नही...

**80 व्या वर्षी हिमालय एवरेस्ट बेस कॅम्प व 79 व्या वर्षी अन्नपूर्णा कॅम्प पायी करून आलेले सत्यदेव वर्मा यांची गोविंदप्रसाद मुंदडा यांनी घेतलेली मुलाखत**



प्रश्न- एवरेस्ट बेस कॅम्प आणि अन्नपूर्णा बेस कॅम्प आपण कधी पूर्ण केला?

अन्नपूर्णा बेस कॅम्प 24 मार्च 2025 ते 4 एप्रिल 2025 या कालावधीत तर एवरेस्ट बेस कॅम्प 14 एप्रिल 2025 ते 28 एप्रिल 2025 या कालावधीत पूर्ण केला.

प्रश्न- अन्नपूर्णा बेस कॅम्प व एवरेस्ट बेस कॅम्पमध्ये काय फरक आहे?

हिमालय पर्वत अतिविशाल महाकाय पर्वत श्रृंखला आहे. हिमालयाच्या सर्वात उंच शिखराला एवरेस्ट म्हणतात. पूवीर्चे लोक यास सागर माथा असे म्हणायचे. परंतु, इंग्लिश लोकांनी यास एवरेस्ट असे नाव दिले. या बेस कॅम्पवरूनच वर एवरेस्ट या शेवटच्या पॉईंटवर जाण्याचा रस्ता आहे. अन्नपूर्णा बेस कॅम्प हा वेगळ्या दिशेला आहे. दुसरा फरक म्हणजे एवरेस्ट (शिखर)ची उंची 8849 असून, एवरेस्ट बेस कॅम्पची उंची 5364 मीटर आहे तर अन्नपूर्णा कॅम्पची उंची 4130 मीटर आहे. तिसरा फरक म्हणजे अन्नपूर्णा कॅम्पची उंची एवरेस्ट बेस कॅम्पपेक्षा कमी आहे. मात्र, याचा रस्ता एवरेस्ट बेस कॅम्पपेक्षा फार अवघड आहे. यामुळेच इथे फार कमी पर्यटक येतात.

प्रश्न- तुम्हाला तेथील ट्रॅकींगची (जाण्याची) प्रेरणा कशी मिळाली?

माझे पुण्याचे मित्र मिस्टर कुंज टीबरेवाल हे जाऊन आले व नंतर मला फोटो पाठवले तेव्हाच मी ठरवले की, मी सुद्धा जाईन.

प्रश्न- तुम्हाला या शिखरावर जाऊन काय अनुभव आले?

एवरेस्ट पूर्ण करून आल्यानंतर मला असे जाणवले की, माझे वय 5 वर्षांनी कमी झाले आणि अन्नपूर्णा पूर्ण करून आल्यानंतर पुन्हा 5 वर्ष वय कमी झाल्याचे अनुभव अनुभवास आले. यामुळेच की काय, मी आता असे ठरवले आहे की, दरवर्षी वेगवेगळे पॉईंट पूर्ण करून सर्व 18 पॉईंटस आयुष्यात पायी जाऊन यायचे आहे.

प्रश्न : आपल्या चमुमध्ये सर्वात सिनियर मेंबर कोण होते?

दोन्ही ट्रॅकमध्ये सर्वात वयस्कर मीच होतो आणि सर्वात ज्युनियर मेंबर एवरेस्ट बेस कॅम्पमध्ये पुण्याचा 18 वर्षीय मुलगा तर अन्नपूर्णा कॅम्पमध्ये 22 वषार्चा मुलगा सर्वात कमी वयाचा होता. दोन्ही वेळेस जेन्ट्ससह काही लेडीज मेंबर पण होते.

प्रश्न-आपल्या परिवाराने संमती दिली का?

अरविंद हा माझा मुलगा लॉसएंजिल्स येथील इरविन मध्ये स्थानिक असून, शुभी ही सून, पुण्यात मुलगी मनीषा व पराग हा जावई आहे. मुलाने जाण्यास तीव्र विरोध केला. परंतु, मी ठाम होतो व गेलो. 26 एप्रिल 2024 रोजी एवरेस्ट कॅम्प करून परतलो, त्याच दिवशी मुलाचा वाढ दिवस होतो. तो एकच म्हणाला. तुम्ही सुखरूप आज माझ्या वाढदिवशी परत आलात, हीच माझ्या आयुष्याची बेस्ट गिफ्ट आहे. दुसऱ्या ट्रॅकसाठी पुन्हा विरोध केला. कारण, हा ट्रॅक अत्यंत अवघड असा होता. परंतु, मी ऐकले नाही व जाऊन सुखरूप परत आलो.

प्रश्न- या वयात एवढी उंच ट्रेकिंग करताना आपण घाबरले होते का?

नाही, मी अजिबात घाबरलो नाही. मी आधीच चालायची तथा पळायची संपूर्ण प्रॅक्टीस करून गेलो होतो.

प्रश्न- वाचकांना काय संदेश द्याल

माझा असा संदेश आहे की, माणसाने एकदा मनात ठरवले की, तो काहीही करू शकतो. "सिमाऐं सिर्फ दिमाग में होती है, उम्र में नही उम्र तो सिर्फ एक आकडा मात्र हैक असे सांगून ज्येष्ठ नागरिकांनीसुद्धा एकदा हिमालयावर जाऊन आनंदाचे अप्रतिम अनुभव घ्यावे तथा आपला आत्मविश्वास हिमालयाएवढा वाढवल्याचे अनुभव द्यावे, असे सांगितले. ज्यांना यासाठी मार्गदर्शन पाहिजे असतील ते माज्याशी 9881744069 या नंबरवर संपर्क साधू शकतात, असे ही वर्मा यांनी सांगितले.

**सीए गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**जालना**

महासागर

●शुक्रवार,दि.२२ ऑगस्ट २०२५

अकोला

पान ३

## नगरपरिषदेची मोठी कारवाई, दुकाने जमीनदोस्त

**अकोट :** छत्रपती शिवाजी महाराज चौक समोरील परिसरातील अतिक्रमित जागेवर थाटलेली दुकाने अखेर अकोट नगर परिषदेच्या अतिक्रमण हटाव पथकाने बुधवारी हटविली. नगर परिषदेकडून गेल्या महिनाभरापासून संबंधितांनाकायदेशीर मालकीचे पुरावे सादर करण्याची संधी देण्यात आली होती; परंतु अतिक्रमणकर्ते ठोस कागदपत्र दाखवण्यात आले नाही. त्यामुळे बुधवारी दुकाने जमीनदोस्त करण्यात आले, या परिसरातील मशिदीच्या रस्त्यावर अतिक्रमण करून वाहतुकीस अडथळा निर्माण केला होता, त्यामुळे दुकाने काढून टाकण्यात आल्या,या कार्यवाहीदरम्यान मुख्याधिकारी डॉ. नरेंद्र बेंबरे स्वतः घटनास्थळी हजर राहून संपूर्ण अतिक्रमण हटाव मोहिमेवर लक्ष ठेवून होते तसेच नगर अभियंता अभिषेक गोतरकर, उपअभियंता दिनेश ठेलकर, उपअभियंता शिवानी ठाकरे, नगररचना अधिकारी अस्मिता पाटील, बांधकाम विभागातील कर्मचारी किशोर तेलगोटे उपस्थित होते.

## अपघातग्रस्त कावड भक्तांची आ. पठाण यांनी घेतली भेट

### ▪प्रकृती जाणून घेत मदत मिळवून देण्याचे दिले आश्वासन

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

रविवारी ता. १७ ऑगस्ट रोजी रात्री गांधीग्राम येथे जात असलेल्या कावड मंडळाच्या सदस्यांना घेऊन जाणारे ट्रॅक्टर पलटी होऊन शिवभक्त जखमी झाल्याची दुःखद घटना घडली होती. या घटनेतील जखमी शिव भक्तांची बुधवारी पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आ. साजिद खान पठाण यांनी भेट घेऊन प्रकृतीची विचार पूस केली तर यावेळी सर्व शिवभक्तांना शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन आ. पठाण यांनी दिले. अखेरच्या श्रावण सोमवारच्या



पूर्वसंध्येला रविवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास कावड मंडळीतील भक्तांना गांधीग्राम येथे घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टर पलटी होऊन अपघात झाला होता. यावेळी या ट्रॅक्टर मधील शिवभक्त जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बुधवारी पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांनी स्वतः के. एस. पाटील रुग्णालय आणि ओझोन रुग्णालयात जाऊन जखमी शिव भक्तांची भेट घेतली. यावेळी उपचार करणाऱ्या डॉक्टर कडून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करीत सर्व शिवभक्तांना शासनाकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तर यापुढे सुद्धा उपचारात कुठल्याही प्रकाराची अडचण आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन सुद्धा जखमी शिव भक्तांना आ. पठाण यांनी केले. यावेळी आकाश कवडे, रवींद्र पाटील, अंकुश तायडे, अभिजित तवर, आर्किटेक्ट सोहेल खान, अभि देशमुख, सुनील देशमुख, शेख अब्दुल्ला यांसह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'रेडक्रॉस' व 'लायन्स'च्या उपक्रमाचा गरजूंना लाभ : पालकमंत्री

### ▪दिव्यांगांना 'जयपूर फूट'चा आधार; पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरण

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

अपंगत्व आल्यास व्यक्तीचे जीवन खडतर होते. त्यात ती कुटुंबातील कर्ती व्यक्ती असल्यास स्थिती आणखी हलाखीची होते. त्यामुळे दिव्यांगांना कृत्रिम अंगरोपण-'जयपूर फूट' विनामूल्य देण्याचा 'रेडक्रॉस' व 'लायन्स'चा उपक्रम गरजूंना आधार देणारा आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.इंडियन रेडक्रॉस सोसायटी व लॉयन्स क्लब ऑफ पुणे सुप्रिम यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंती निमित्त जि. प. कर्मचारीभवन येथे पालकमंत्र्यांच्या हस्ते जयपूर फूट विनामूल्य वितरण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. शहाजीराव देशमुख अध्यक्षस्थानी होते. आमदार रणधीर सावरकर, आमदार वसंत खंडेलवाल, रामेश्वर मणियार, आशा मणियार, रजनी अंबादे, आकाश अंबादे, नितीन धोत्रे, सुधा धोत्रे, संस्थेचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार, प्रकाश गवळी, अविनाश बेलोकार, प्रभजितसिंह बछेर, संजना





झंवर, डॉ. अस्मिता सुराणा, ॲड. सुभाषसिंह ठाकूर आदी उपस्थित होते.पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, रेडक्रॉस व लायन्स क्लब या संस्थांनी शिबिराद्वारे २ दिवसांत ३०० लोकांचे स्क्रिनींग करून त्यानुसार गरजूंना तातडीने अवयव उपलब्ध करून दिले. हे मोठे सेवाकार्य आहे. स्व. भाऊसाहेबांशी रेडक्रॉसशी जिव्हाळ्याचे नाते होते. संस्थेचे सेवाकार्य पुढे जाण्यासाठी त्यांचे नेहमी सहकार्य राहिले. संस्थेच्या सदस्यांचा सेवाभाव व मेहनतीमुळे दिव्यांग बांधवांसाठी हे कार्य उभे राहिले आहे.आमदार श्री. सावरकर, डॉ. देशमुख आदी मान्यवरांनीही मनोगत व्यक्त केले.

डॉ. मालोकार यांनी प्रास्ताविक केले. संदीप पुंडकर, ॲड. सुभाष मुंगी, ॲड. महेंद्र साहू, प्रशांत राठी, संदेश रांदड, कपिल रावदेव, राजू बुडुकले, रामहरी डांगे, सुनीता कुलकर्णी, अमर गौड, डॉ. गजानन वाघोडे, पंकज राठी, मनोज चांडक, दिलीपसिंह गोसल, डॉ. सिमरनजीतसिंह बछेर, अनमोलसिंह बछेर आदी उपस्थित होते.

**जिल्हाधिका-यांची सदिच्छा भेट**

जिल्हाधिकारी वर्षा मीना आज महाशिबिरला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.



## अकोला मूर्तिजापूरात इतिहास हादरला, गूढ सांगाड्यांचे रहस्य दडलेलं!





**▪मुर्तिजापुर,दि २१ (प्रतिनिधी) :**

मूर्तिजापूर शहरात खळबळजनक व थरारक घटना समोर आली आहे. खदान तलावाच्या सौंदर्यीकरणादरम्यान जेसीबीद्वारे ५० फूट खोल खोदकाम होत असताना प्राचीन सांगाड्यांचे अवशेष व मडक्यांचे तुकडे उघडकीस आले.

या अचानक मिळालेल्या अवशेषांमुळे परिसरात भीतीचे व गूढतेचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांमध्ये प्रचंड धास्ती पसरली आहे. अनेकांच्या मनात हे प्राचीन संस्कृतीचे दडलेले रहस्य असावे, असा संशय व्यक्त केला जात आहे.या अवशेषांचे नमुने तपासणीसाठी भारतीय पुरातत्व विभागाकडे पाठविण्यात येणार आहेत. तोपर्यंत हा प्रकार शहरासह जिल्ह्यात चर्चेचा व रहस्याचा विषय ठरत आहे.

या महत्त्वाच्या कार्यवाहीदरम्यान घटनास्थळी मा. आमदार हरिषभाऊ पिंपळे, उपविभागीय अधिकारी श्री. संदीपकुमार अपार, मा. डी. वाय.एस.पी., तहसीलदार शिल्पा बोबळे,शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अजित जाधव, ग्रामीण पोलीस निरीक्षक श्रीधर गुट्टे व नगरपरिषद अधिकारी उपस्थित होते. इतिहास हादरवणाऱ्या या उघडकीनंतर मूर्तिजापूरात थरारक आणि गूढतेचे सावट पसरले आहे.

# धावत्या अकोट रेल्वेत महिलेने दिला बाळाला जन्म

### ▪रेल्वे स्टेशनवर डॉक्टरच्या अनुपस्थितीने संताप

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

अकोटहून अकोल्याला येत असलेल्या एका गर्भवती महिलेने धावत्या रेल्वेमध्ये एका मुलीला जन्म दिल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेत आरपीएफ जवान आणि रेल्वे प्रवाशांनी माणुसकी दाखवत तातडीने मदत केली. मात्र, ऐनवेळी अकोला रेल्वे स्थानकावर रेल्वे डॉक्टर उपलब्ध नसल्याने प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.अकोट येथील रहिवासी असलेली एक गर्भवती महिला रविवारी रात्री तिच्या सासरच्या लोकांसोबत अकोट-अकोला डेमू रेल्वेने अकोल्याला येत होती. प्रवास सुरू असतानाच तिला अचानक प्रसूती वेदना सुरू झाल्या. उगवा ते अकोला दरम्यानच्या प्रवासातच तिने एका मुलीला जन्म दिला. यावेळी डब्यातील इतर प्रवाशांनी आणि तिच्या सोबतच्या नातेवाईकांनी तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. त्यांनी माणुसकीचा परिचय देत महिलेची तात्पुरती काळजी घेतली. रेल्वे अकोला स्थानकावर डेमु पोहोचल्यावर आरपीएफ दक्षिण मध्य रेल्वेला या घटनेची माहिती



**▪अश्या गंभीर परिस्थितीत रेल्वे डॉक्टरच्या अनुपस्थितीमुळे रेल्वे प्रशासनाच्या वैद्यकीय सुविधांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, या निष्काळजीपणामुळे प्रवाशांमध्ये संताप दिसून आला. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर पावले उचलण्याची मागणी होत आहे.**

**▪अकोला स्टेशनवर रेल्वे डॉक्टरची अनुपस्थिती ही अत्यंत गंभीर बाब असून, याबाबत डीआरएम दक्षिण मध्य रेल्वेकडे तक्रार दाखल करणार आहे. – एजाज अहमद, अकोला (डीआरयूसीसी नांदेड )**

मिळाली. त्यानुसार, रेल्वे स्थानकावर महिला कॉन्स्टेबल आणि अधिकाऱ्यांनी मदत केली व तात्काळ महिलेला सुरक्षितपणे रेल्वेतून बाहेर काढले आणि ऑटोने नजीकच्या रुग्णालयात पाठवले. सध्या आई आणि बाळ दोघांचीही प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.या कौतुकास्पद कामगिरीबद्दल आरपीएफचे ठाणेदार एम.ए. नावकार, स्वस्तिमा रायबोले, एएसआय संजय सुराडे, रेल्वे प्रवासी एकता मजूर संघाच्या ममता जेरपोतवार आणि डीआरयूसीसी (नांदेड) एजाज अहमद यांच्या कामाची प्रशंसा केली जात आहे.

## थोडक्यात

### बालिका भक्ती वर्मा लिटिल अबॅकस स्पर्धेत प्रथम

अकोला : स्थानीय रामदास पेठ परिसरातील रहिवाशी तथा कार्मेल शाळेतील तिसऱ्या वर्गाची विद्यार्थिनी बालिका भक्ती अक्षय वर्मा ही लिटिल अबॅकस स्पर्धेत प्रथम



पारितोषिकाची मानकरी ठरली. अमरावती येथे जीनियस यू विद्यम समूहाच्या वतीने नुकत्याच संपन्न झालेल्या लिटिल जीनियस नॅशनल लेवल ओपन अबॅकस व वेदिक मॅथ स्पर्धेत तिने १०० गुणांपैकी ९८ गुण प्राप्त करीत लिटिल अबॅकस चॅम्पियन पदाचा मान प्राप्त केला. यापूर्वी तिने शेगाव येथे संपन्न झालेल्या अबॅकस स्पर्धेत आपले स्थान भक्कम केले होते.तिने आपल्या यशाचे श्रेय अनुजा अबॅकस अकॅडमीच्या अर्चना शर्मा व आपल्या शिक्षकांना दिले आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे आजोबा महेंद्र खंडेडिया, वडील अक्षय वर्मा, आई काजल वर्मा, जितेंद्र गणात्रा, डॉ महेश वर्मा, डॉ गजानन वाघोडे, नंदकिशोर द्रोण ,अरविंद कक्कड आदींनी कौतुक केले.

### दहहिंडी उत्सवात साजरी

**पातुर.** येथील कान्होबा चौक येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा राखोंडे परिवार व साने गुरुजी मंडळ,पातुर व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान,पातुर व स्व.विनायक राखोंडे स्मृती गणेशोत्सव मंडळ,पातूर यांच्या वतिने श्री कान्होबा यांच्या मंदिरामध्ये श्रीकृष्ण जन्मष्ठमी निमित्त मध्यरात्री श्री कान्होबा यांची विधिवत पुजा केली तर दुसऱ्या दिवशी महाआरती करुन सायंकाळी पातूर येथील मध्य नगरीतील कान्होबा चौकामध्ये गोपाळकाला निमित्य दहीहंडी फोडुन उत्सव आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी सदर सर्व युवकांनी व बाल गोपालांनी एकमेकांच्या सहकार्याने मानवी मनोरा उभा करुन बाळू उर्फ गणेश देवकर यांने तिसऱ्या थरावर चढुन दहीहंडी फोडली यावेळी राखोंडे परिवारा कडुन उपस्थित सर्व बाल गोपालांना दहिकाल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.

## अपघात ग्रस्त शिवभक्तांना शासनाची त्वरित मदत मिळावी

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** स्थानिक अकोला शहरातील श्री राज राजेश्वर पालखी व कावळ सोहळा हर्ष उल्हासनगरमध्ये संपन्न झाला. यामध्ये अपघात ग्रस्त शिवभक्तांना शासनाची त्वरित मदत मिळावी म्हणून अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश दादा फुंडकर यांना गोपाल नागपूरे शिवसेना ओबीसी जिल्हा प्रमुख अकोला यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले.यावेळी शिवसेना महिला आघाडी उपाध्यक्ष सौ.विजया राजपूत,शहर प्रमुख, सौ निश्या ग्यारल, बाळु ढोले, रवि देशमाने, अविनाश खुनेरे हे उपस्थित होते. अकोला शहरातील पालखी व कावड हा उत्सव साजरा करताना रविवार दि १७/८/२०२५ रोजी डाबकी रोडवासी कावड मंडळाचा ट्रॅक्टर भीम नगर चौक येथे पलटी होऊन पंधरा वीस कार्यकर्ते हे गंभीर स्वरूपात जखमी झाले होते तसेच दुसरी घटना ही पातुर शहरातील



शिवभक्त मध्य प्रदेश या शिवनी येथे काशी येथून जल आणतांना नामे अरविंद बंडू बंड वय ५५ वर्ष अविनाश पोहरे वय ३३ वर्ष हे अपघातात मृत्युमुखी पडले तसेच २०२४ मध्ये सतीश रोडेकर वय ४० या शिवभक्ताचे हृदयविकाराने निधन झाले आहे. उपरोक्त सर्व घटना या कावड व पालखी शिवभक्तांशी संबंधित असून ह्या सर्वांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी व मृत शिवभक्तांच्या परिवार ला आर्थिक सहाय्यता निधी म्हणून उपलब्ध करून देण्यात यावा या बाबत चे निवेदन देण्यात आले आहे.

## नंद के आनंद भयो' च्या गजराने दुमदुमले जलाराम मंदिर

### ▪लोहाना मला मंडळाचा नंदोत्सव जल्लोषात संपन्न

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

सामाजिक व सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या अकोला लोहाना महिला मंडळाच्या वतीने बिर्ला कॉलनी परिसरातील जलाराम मंदिरात भव्य नंदोत्सव साजरा करण्यात आला.यावेळी 'नंद के आनंद भयो' जय कन्हैया लाल की'च्या गजराने जलाराम मंदिर गजबजून गेले.हा नंदोत्सवाचा रंगारंग सोहळा बघण्या साठी मंदिर परिसरात मातृशक्तींनी एकच गर्दी केली होती.जन्माष्टमीचे औचित्य साधून या उत्सवात कार्यक्रम स्थळाला संपूर्णपणे सजविण्यात येऊन भगवान बाल कृष्णाची विहंगम झाकी साकार करण्यात आली होती. लोहाना महिला मंडळाच्या अध्यक्षा सोनलबेन ठक्कर यांच्या पुढाकारात व यजमान हर्षाबेन गिरीशभाई कोटक परिवार यांच्या उपस्थितीत संपन्न या सोहळ्याचा प्रारंभ आरती व संगीतमय सुरेल भजनांनी करण्यात आला. यावेळी



बालकृष्णाची सजीव झाकी तयार करून या झाकी भोवती महिलांनी सुंदर गरबा नृत्य करून परिसरात भक्तिमय वातावरणाची निर्मिती केली. यावेळी कृष्ण जन्माची अद्भुत झाकी साकार करण्यात आली. वासुदेवाने भगवान बाल कृष्णाला टोपलीत नेण्याचे सुंदर सादरीकरण यावेळी करण्यात आले. या जल्लोषपूर्ण वातावरणात यावेळी बधाई वितरित करण्यात आली. या झाकीत बालकृष्ण मनंत कोटक बनला. वासुदेवाची भूमिका पंकज कोटक यांनी,नंदबाबा आशीष कोटक बनलेत. यशोदा मातेची भूमिका अनामिका कोटक यांनी तर नंदबाबा आशीष कोटक बनलेत. दरम्यान मंदिरात दहीहंडी उत्सवाचा जल्लोष ही साजरा करण्यात आला लहान बच्चे कंपनीने यावेळी दहीहंडी फोडून जल्लोष केला. समाजाच्या वरिष्ठ महिलांनी यावेळी भगवान कृष्णाचे पूजन करून एकमेकांना शुभेच्छा दिल्यात. संचालन महिला मंडळाच्या राधाबेन सावजियानी यांनी केले.आरती व प्रसादाने या नंदोत्सवाचे मोठ्या भक्तीभावात समापन करण्यात आले.

# पर्यूषण पर्वात जैन मंदिरात आ.पठाण यांचा सत्कार

### ▪ सर्वधर्म समभावतेचा दिला संदेश

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**

जैन समाजाचा पवित्र महिना म्हणून पर्यूषण पर्व सध्या सुरू आहे. या पर्वात जैन समाज बांधव तप, ध्यान, अहिंसा आणि क्षमापणा या सूत्रांचे पालन करीत उपवास धारण करतात. या पर्वात गांधी रोडवरील जैन मंदिर संस्थान व समाज बांधवांनी पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांचा मंदिरात शाल, श्रीफळ व भगवान आदिनाथ जैन यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.

सद्यस्थितीत जैन समाजाचा पवित्र महिना म्हणून पर्यूषण पर्व सुरू आहे. या पर्वात जैन समाज बांधवांच्या वतीने तप, ध्यान, अहिंसा आणि क्षमापणा या चतुसूत्रांचे पालन करून उपवास धारण केले जातात. या पर्वात जैन समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपासना करतात. शहरातील गांधी रोडवरील जैन मंदिरात या पर्वाच्या अनुषंगाने



अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार साजिद खान पठाण यांचा मंदिर प्रतिष्ठान आणि समाज बांधवांच्या वतीने गुरुवारी दुपारी शाल, श्रीफळ व भगवान आदिनाथ जैन यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संपूर्ण मंदिराची, या पर्यूषण पर्वाची माहिती मंदिर प्रतिष्ठानतर्फे आ. पठाण यांना देण्यात आली. यावेळी मंदिरात या पर्वा निमित्त आलेले महाराज परमपूज्य पन्यास परमहंस विजयजी महाराज यांनी आ. पठाण यांना आशीर्वाद दिला. याप्रसंगी राजेश शाह, मयूर शाह, भरत शाह, सतीश कोठारी, राजू भंडारी, अनूप खरारे, मनन शाह यांचे सह समाज बांधव उपस्थित होते.

## सर्जा राजाला सजविण्यासाठी सजला बाजार

### ▪पोळ्याच्या साहित्यावर मह ागाईचे सावट

**▪अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :** श्रावण महिन्याच्या शेवटी येणाऱ्या पोळा सणाची सर्वांना उत्सुकता लागली आहे जरी या यांत्रिक युगात बैलांचे महत्त्व कमी झाले असते तरी व शेतकऱ्यांकडे जोड्या कमी झाल्या तरी जो तो आपापल्या परीने हा परंपरागत सण साजरा करतात.

शेतकऱ्यांना वर्षभर शेतात राबण्यासाठी मदत करणाऱ्या सर्जा-राजाचा पोळा सण यंदा शुक्रवारी दि. २२ ऑगस्ट रोजी साजरा होत आहे. त्यानिमित्त बाजरापेठेत आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवण्याकरिता साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची बाजारात गर्दी होत आहे. परंतु यंदा बैलपोळ्याला महागाईचा फटका बसला असून बैलांच्या साजाचे साहित्य १५ ते २० टक्क्यांना महागले आहे. शेतात वर्षभर राबणाऱ्या बैलांप्रती पिठोरी आमावस्येच्या दिवशी कृतज्ञता व्यक्त केली जाते.

या सणासाठी राखी पोर्णिमा झाल्यानंतर शेतकऱ्यांची लगबग सुरू होते. प्रत्येक शेतकरी आपल्या ऐपतीनुसार आपल्या सर्जा-राजाला नवी आभूषणे खरेदी करतो. पाऊस चांगला झाला, तर शेतकरी मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. मात्र, कमी झाला तर खरेदीसाठी हात आखडता घेतला जातो. यंदा जिल्ह्याच्या काही भागात पाऊस चांगला झाला असून, काही भागात कमी आहे.

# अण्णा.. आम्हाला माफ करा!

कर्मवीर अण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी विद्यार्थ्यांसाठी गळ्यातलं मंगळसूत्र विकलं होतं. त्याच अत्यंत नामवंत अशा रयत शिक्षण संस्थेत बाया नाचवताना पहायला मिळाव्यात हे समस्त बहुजन समाजाचे दुर्दैव म्हणावे लागेल. सुसंस्कृत महाराष्ट्राची अशी भीषण अधोगती आहे की नाही ? यावर आता मंथन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात अशा अनेक शिक्षण संस्था आहे की, त्या संस्थेच्या संस्थापकांनी पदरमोड करून संस्था मोठ्या केल्या. एवढेच नव्हे तर कुटुंबातील महिलांनी गळ्यातील सोन्याचे दागिने मोडून गोरगरिबांच्या मुलांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली. त्याबाबतीत कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांनी जो त्याग केला, अशाच प्रकारचा त्यात नाशिक जिल्ह्यात मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेत कर्मवीर रावसाहेब थोरात आणि त्यांच्या परिवाराने देखील केला आहे. त्यामुळेच अशा शिक्षण संस्थांमध्ये पावित्र्य राखले जाणे गरजेचे वाटते. ग्रामस्थांचा हेतू वेगळा तर शिक्षण संस्थेचा हेतू वेगळा असू शकेल. परंतु समाजामध्ये त्यामुळे चुकीचा संदेश जातो. आता यानिमित्ताने पवार परिवारासह संस्थेतील कार्यकारी मंडळावर टीकास्त्र सोडले जातीलच. अशा कार्यक्रमासाठी परवानगी देऊ नये, असे ठराव कदाचित भविष्यात होतील. परंतु कित्येक वेळा ग्रामस्थांच्या पुढे संस्था चालकांना देखील जाता येत नसते. त्यामुळे संस्थेच्या प्रांगणात कोणते कार्यक्रम घ्यावेत याचा सालासार विचार झाला पाहिजे. ज्या संस्थेला देदीप्यमान शैक्षणिक वारसा आहे, अशा महाराष्ट्रातील नामांकित रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात अश्लील 'नाच' हा प्रकार संतापजनकच ठरला. कारण या संस्थेकडे अत्यंत आदराने पाहिले जाते. पण या आदराला गालबोट लागेल असाच हा प्रकार म्हणावा लागेल. बारामतीच्या मोरगावमधील रयत शिक्षण शिक्षण संस्थेत मुलं शिक्षणासाठी येत असतात. मात्र या शिक्षण संस्थेच्या प्रांगणात झालेल्या एका कार्यक्रमात 'नाचा'चा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचं समोर आलं आहे. धक्कादायक बाब म्हणजे नाचताना डान्सरने अतिशय अश्लिल हावभाव केल्याने संस्थेच्या हितचिंतकांना वाईट वाटले. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही संताप व्यक्त केला. गावच्या ग्रामदैवत भैरवनाथाच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या मनोरंजनाच्या ऑर्केस्ट्राच्या तो कार्यक्रम होता. रयत शिक्षण संस्थेअंतर्गत राज्यात अनेक ठिकाणी विद्यालयं चालवली जातात. ही राज्यातील एक नावाजलेली संस्था आहे. विशेष म्हणजे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड. भगीरथ शिंदे यांच्यासह अनेक जण या संस्थेचे नेतृत्व करतात. घडलेला प्रकार रयत शिक्षण संस्थेच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असून शैक्षणिक संस्थेच्या पवित्रतेला धक्का लावणारा ठरला.

गावातील यात्रेमध्ये तमाशाच्या माध्यमातून नृत्याचे प्रकार हे ठरलेलेच असायचे. पूर्वीच्या काळी नृत्यांमध्ये एक विशेष अदाकारी होती. त्यात अश्लीलपणा नव्हता. परंतु आता मात्र त्यात एक वेगळेपणाच आला आहे. गौतमी पाटील, माधुरी पवार यांसारख्या ऑर्केस्ट्रा डान्सर मुलींना आजकाल 'कला' व 'सांस्कृतिक' कार्यक्रमाच्या नावाखाली स्टेजवर बोलावले जाते.

आज महाराष्ट्रात असा एकही कानाकोपरा नाही जिथे यांनी हजेरी लावली नसेल. विशेषतः दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र किंवा कुठलाही उत्सवी कार्यक्रम जवळ आला की यांचे शो ठरलेले असतात. कुठेही सांस्कृतिक या नावाखाली कार्यक्रम होत असला तरी या मुलींना हजेरी लावायला बोलावले जातेच.

यामध्ये महत्त्वाचे म्हणजे अशा गडगंज कार्यक्रमांना राजकीय पाठबळ असते. राजकीय नेत्यांना गर्दी हवी असते आणि लोकांना मनोरंजन हवे असते. कलाकार म्हणवणाऱ्यांना पैसा हवा असतो. म्हणूनच राजकीय अधिष्ठान असलेल्या कार्यक्रमांमध्ये या मुलींना पहिले प्राधान्य दिले जाते.

त्यांच्यासाठी मोठमोठे बॅनर, पोस्टर्स, विशेष गाड्या, सुरक्षा, लोकांसमोर सत्कार, सगळे ठरलेले असते. राजकीय लोक त्यांना स्वतःच्या पैशाने प्रोत्साहन देतात. कारण यातून त्यांची लोकप्रियता वाढते आणि त्या मुलींकडेही पैशाचा ओघ जाऊन मिळतो. पण आजकाल रंगमंचावर घडते काय तर डोळे मारणे, शिट्ट्या वाजवणे, विचित्र हालचाली करून अंगविक्षेप दाखवणे, अंगप्रदर्शन करणारे हावभाव करणे हेच या कार्यक्रमांचे मुख्य आकर्षण असते.

अशा प्रकारच्या अभिनयालाच ही मंडळी कला म्हणतात. या सगळ्याला कला म्हणणे देखील ही पुरुषसत्ताक मानसिकतेचीच देण आहे. कारण मंचावर स्त्रिया वस्तूप्रमाणे उभ्या केल्या जातात आणि पुरुषी वासना संस्कृती म्हणून लोकांसमोर मिरवली जाते. हे आधुनिक सरंजामी तंत्र आहे.

जुन्या काळी जसे जमावाला दारू तमाशाने बहकवायचे, तसेच आज लोकांना अशा अश्लील कार्यक्रमांनी फसवले जाते. खऱ्या अर्थाने लोककला म्हणजे ग्रामीण भागातील जीवन, लोकपरंपरा, संघर्ष, शौर्य, भक्ती किंवा संस्कार यांचे दर्शन घडवणारी कला. पण इथे लावणी, तमाशा लोककलांच्या नावाखाली अश्लील हालचालींचे प्रदर्शन होते.





प्रेक्षकांमध्ये फक्त तरुण मुलं-मुलीच नसतात, तर शाळकरी मुले, लहान मुली, मध्यमवयीन आणि वृद्ध मंडळी सगळे असतात. हे सर्व लोक अशा दृश्यांना सामोरे जातात आणि त्या वातावरणाला 'सांस्कृतिक कार्यक्रम' (?) म्हणतात. त्यामुळे मुलांवर लहान वयातच चुकीचे संस्कार होतात.

तरुण पिढी अश्लीलतेकडे आकर्षित होते आणि मोठी मंडळीही हेच 'मनोरंजन' म्हणून स्वीकारतात. त्यामुळे एकंदरित वातावरणावर अश्लीलतेचा पगडा बसतो. मुळातच कोणतीही कला ही समाजाला विचार देणारी, प्रेरणा देणारी, माणसाला सौंदर्यदृष्टी आणि नैतिक मूल्यं शिकवणारी असते. परंतु या मुली आणि त्यांना प्रोत्साहन देणारे आयोजक केवळ पैसा, टाळ्या आणि स्वस्त लोकप्रियतेसाठी मंचाचा वापर करत आहेत. त्यांचे कार्यक्रम हे क्षणिक आकर्षण निर्माण करतात. पण त्यातून समाजाच्या नैतिक मूल्यांचे अधःपतन होते.



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आज महाराष्ट्रातील लोककला लावणी, पोवाडा, भारूड या कलांना जगासमोर उभे राहण्यासाठी धडपड करावी लागते. त्याचवेळी तथाकथित 'स्टेज डान्स' समाजात 'संस्कृती' म्हणून पोसले जात आहेत. हे दृश्य केवळ कलाविकृतीचे उदाहरण आहे. जर अशा कार्यक्रमांमुळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडत असेल, पुढच्या पिढीला चुकीचे संस्कार मिळत असतील, तर अशा प्रकारच्या तथाकथित कार्यक्रमांना हजेरी लावणे कितपत योग्य आहे? याचा विचार सर्व नागरिकांनी करणे गरजेचे आहे.

पण प्रश्न असा की, ज्यांना हे सगळे 'कला' म्हणून आदर्श वाटते, त्यांच्यातले कुणी आपल्या घरातून गौतमी पाटील किंवा माधुरी पवार घडवायला तयार आहे का? आपल्या मुलींना, बहिणींना किंवा बायकोला या रंगमंचावर नाचवून 'संस्कृती' घडवता येईल का ? जर उत्तर नाही असेल, तर लोकांसमोर उभ्या राहणाऱ्या मुलींना मात्र अशा अश्लील नाच-गाण्याचे प्रतीक बनवून, टाळ्या, शिट्ट्या वाजून तुम्ही महाराष्ट्रासमोर काय सिद्ध करू इच्छित आहात? त्यामुळेच या सर्व प्रकाराला फक्त राजकारण्यांना दोष देऊन चालणार नाही, तर त्या कार्यक्रमासाठी गर्दी करणाऱ्या रसिकांनाही त्याचा दोष द्यावा लागेल.

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील सर्वात आदर्श शिक्षण संस्था आहे. त्यामुळे झालेल्या प्रकारामुळे त्या शिक्षण संस्थेला मानहानिकारक टीकेला सामोरे जावे लागले. तरी देखील या संस्थेबद्दलचा आदर्श समाजात कायम राहील, यासाठी समाजाने देखील आता जागृत राहिले पाहिजे. मात्र असे प्रकार पुन्हा घडू नये यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावे. तूर्त तरी अण्णांनी सर्वांना माफ करावे हीच माफक अपेक्षा!

### गावात मैदानच नसल्याने हा प्रकार घडला

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील एक नावाजलेली शैक्षणिक संस्था आहे, जी राज्यभरात अनेक शाळा आणि महाविद्यालये चालवते. मोरगाव येथील मयुरेश्वर विद्यालयही याच संस्थेच्या अंतर्गत आहे. या शाळेच्या प्रांगणात दरवर्षी भैरवनाथ यात्रेनिमित्त मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, कारण गावात स्वतंत्र मैदान उपलब्ध नाही. स्थानिकांच्या मते, ही वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. मात्र, यंदाच्या कार्यक्रमातील नृत्याच्या अश्लील स्वरूपामुळे ही परंपरा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आता या घटनेला राजकीय रंग प्राप्त झाला आहे. विरोधकांनी या व्हिडिओचा आधार घेत पवार कुटुंबावर टीका सुरू केली आहे. शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारचा कार्यक्रम होणे अयोग्य असल्याचा आरोप त्यांच्याकडून होत आहे. यामुळे बारामतीच्या राजकीय वातावरणात तणाव निर्माण झाला आहे. मोरगाव हे अष्टविनायकांपैकी मयुरेश्वर गणपती मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. या मंदिराला भेट देण्यासाठी राज्यभरातून भाविक येतात. मात्र, यंदाच्या वादग्रस्त नृत्यामुळे या परंपरेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता इथून पुढे गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन पुन्हा अशा प्रकारचा सार्वजनिक तमाशा होऊ नये म्हणून पुढाकार घेतला तर गावातील वातावरण देखील पूर्वीसारखेच चांगले राहील.

### संस्थेने 'कमवा आणि शिका' हा मंत्र दिला

रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काले गावात केली. त्यांचा उद्देश बहुजन समाजातील, विशेषतः मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा होता. कमवा आणि शिका या मंत्राद्वारे त्यांनी स्वावलंबी शिक्षणावर भर दिला आणि ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. रयत शिक्षण संस्थेने शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच सामाजिक समता, बंधुता आणि श्रमप्रतिष्ठा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. संस्थेने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था आणि वसतिगृहे स्थापन केली. दलित आणि उपेक्षित समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उघडून अंधश्रद्धा, अस्पृश्यता आणि जातीभेदाविरुद्ध लढा दिला. आज संस्था महाराष्ट्र आणि कर्नाटकात ६७९ शाखांद्वारे साडेचार लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देते. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील १६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे, ज्यात ४३ महाविद्यालये, ४३९ शाळा, १७ कृषी महाविद्यालये आणि अनेक वसतिगृहे समाविष्ट आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे त्यांना १९५९ मध्ये पद्मभूषण पुरस्कार मिळाला. संस्था आजही शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवत आहे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे.

# भविष्यातील विश्वगुरू भारतासाठी शिक्षणाचा मंत्र

(कालच्या अंकावरून पुढे)

जर आपली शाळा आणि पालक या मुल्यांचे बीजारोपण लहान वयातच करतील, तर ही मुले भविष्यातः

वयाने मोठ्यांचा आदर करतील, समाजात सहअस्तित्व राखतील, मतभेद असूनही संवाद साधतील, आणि निर्णय घेताना स्वतःपेक्षा समाजाच्या हिताचा विचार करतील. या सर्वांचा थेट परिणाम देशाच्या सामाजिक सलोख्यावर आणि एकूण विकासावर होतो.

थोडक्यात काय? जर आपण भारताला विकसित राष्ट्र बनवायचं ठरवलं असेल, तर फक्त ऋद्ध वाढवणं, तंत्रज्ञानात प्रगती करणं, किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणं पुरेसं नाही. देशाच्या प्रगतीचा खरा वेग हे त्याच्या नागरिकांच्या मानसिकतेवर आणि मूल्यांवर अवलंबून असतो.

यासाठी आवश्यक आहेः शाळा पातळीवर civic sense शिकवणं, सार्वजनिक मालमत्तेला आपलं मानण्याची सवय घालणं, नम्रता, आदर, सहिष्णुता यांसारख्या मुल्यांचं शिक्षण देणं, आणि पालक व शिक्षक यांचा सक्रिय सहभाग असणं.

ज्याप्रमाणे इमारतीचा पाया मजबूत असेल तर ती भक्कम उभी राहते, त्याचप्रमाणे देशाच्या भविष्यातील पायाला घडवायचं असेल, तर मुलांमध्ये लहानपणापासूनच योग्य मूल्यं, समज, आणि जबाबदारीचं भान निर्माण करणं अत्यावश्यक आहे.

अंतिम भाग

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे, पण दुर्दैवाने आज कृषिक्षेत्र मागे पडताना दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या क्षेत्राबाबत पुरेशी जागरूकता आणि प्रतिष्ठा समाजामध्ये अद्याप निर्माण झालेली नाही. इतर क्षेत्रांप्रमाणेच कृषी क्षेत्राचं देखील राष्ट्रनिर्मितीत मोलाचं योगदान आहे, पण दुर्दैवाने याकडे फारसं गांभीर्याने पाहिलं जात नाही.

आज जर एखाद्या वर्गातील १०० विद्यार्थ्यांना विचारलं की तुम्हाला मोठं होऊन काय बनायचं आहे, तर त्यातील फारच थोडे कदाचित २-३ विद्यार्थी मला शेतकरी व्हायचं आहे असं सांगतील. उर्वरित मुलं डॉक्टर, इंजिनीअर, आयएएस अधिकारी, सॉफ्टवेअर डेव्हलपर होण्याचं स्वप्न पाहतील. ही गोष्ट आपल्या समाजातील मानसिकतेचं आणि कृषी क्षेत्राविषयी असलेल्या गृहित धारणा यांचं वास्तव दर्शवते.

पण जर आपण लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राचं महत्त्व, त्यातील संधी, आणि शाश्वत विकासात शेतकऱ्यांची भूमिका शिकवायला सुरुवात केली, तर निश्चितच भविष्यात देशाला सशक्त, साक्षर, आणि आधुनिक विचारसरणी असलेले शेतकरी लाभतील झ ज्यांची आज अत्यंत गरज आहे. तसंच, पारंपरिक शेती पद्धतींमध्येही आता बदल घडवणं अत्यावश्यक आहे.

आज आपण रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे मातीच्या सुपीकतेचा नाश करत आहोत. ही कृत्रिम शेती भविष्यात निसर्ग, आरोग्य आणि अन्नसुरक्षेसाठी गंभीर धोका ठरू शकते. म्हणूनच, आता वेळ आली आहे की शेतीमध्ये सेंद्रिय पद्धती (organic farming), नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञान, आणि स्मार्ट ॲग्रीकल्चर यांचा वापर करून पर्यावरणपूरक, टिकाऊ, आणि उत्पादक शेतीकडे वाटचाल करावी.

विद्यार्थ्यांना लहानपणापासून शेतीचे मूल्य शिकवणं, तिला प्रतिष्ठा देणं, आणि नव्या तंत्रज्ञानासह आधुनिक शेतीचे शिक्षण देणं हे आपल्या शिक्षणपद्धतीचा अविभाज्य भाग बनणं अत्यंत गरजेचं आहे. यातूनच आपल्याला उद्याचे यशस्वी शेतकरी आणि सशक्त भारत घडवता येईल.

विद्या भारती ही एक संघटित सामाजिक शैक्षणिक चळवळ असून, ती आज संपूर्ण भारतात राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहे. सध्या देशभरात विद्या भारतीच्या मार्फत सुमारे १२,००० शाळा थेट चालवल्या जात आहेत, तर आणखी २४,००० शाळा विविध संस्थांच्या माध्यमातून या चळवळीशी सलग्न आहेत. म्हणजेच एकूण ३६,००० शाळा विद्या भारतीच्या शिक्षणदृष्टीकोनाने प्रेरित होऊन कार्यरत आहेत.

विद्या भारतीच्या शिक्षणपद्धतीचा केंद्रबिंदू म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधारित शिक्षण, आणि संस्कारांचे संवर्धन. हे शिक्षण आपल्या भारतीय संस्कृती आणि हिंदुत्ववादी विचारसरणीचा पाया मानते.

प्राचीन भारत विश्वगुरू होता, कारण इथे केवळ ज्ञानच नव्हे, तर मूल्य, आचारधर्म, आणि चारित्र्य यांना सर्वोच्च स्थान दिलं जात होतं. आजही आपण २१ व्या शतकात भारताला पुन्हा विश्वगुरू बनवायचं असेल, तर नवीन पिढीमध्ये देशभक्ती, संयम, सेवा, आणि नीतिमूल्यांची रुजवणूक झाली पाहिजे झ आणि हे कार्य शिक्षणाच्या माध्यमातूनच साध्य होऊ शकतं.

विद्या भारती हीच भूमिका पार पाडत असून, संपूर्ण देशभरात ती नव्या पिढीमध्ये भारतीय संस्कृतीवर आधारित शिक्षण मूल्यांचं सिंचन करत आहे. म्हणूनच, भारतातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांनी विद्याभारतीच्या या व्यापक कायार्शी सलग्न होऊन मूल्याधारित शिक्षण देण्याच्या या राष्ट्रीय प्रयत्नाला हातभार लावणं ही काळाची गरज आहे. या समन्वयातून एक नवा भारत उभा राहील झ असा भारत जो केवळ ज्ञानसमृद्धच नव्हे, तर संस्कारी, सशक्त, आणि पुन्हा एकदा जगाला मार्गदर्शक बनण्यास सज्ज असेल, म्हणजेच विश्वगुरू भारत.

सारांशतः, आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये अभ्यासक्रमाचे अद्यतीकरण, इंटर्नशिपला अनिवार्यता, स्किल-आधारित मूल्यांकन, उद्योग-शिक्षण समन्वय, आणि विद्यार्थी-केंद्रित विचारसरणी ही तत्त्वे अंगीकारली तरच आपण भविष्यातील जागतिक स्पर्धेमध्ये टिकू शकतो.

केवळ मार्क्सच्या आधारावर शिक्षणाचा दर्जा मोजणं थांबवावं लागेल, आणि त्याऐवजी, विद्यार्थ्यांनी काय करू शकतात यावर भर द्यायला हवा. ही गरज आता नाहीतर कधीच नाही. देशाची खरी उन्नती हे शिक्षणावर अवलंबून आहे, पण केवळ शिक्षणच नव्हे तर योग्य शिक्षणावर!

■ श्रिजीत राजश्री चेतक भोकरे
१२ वी (विज्ञान शाखा)
मॉडेल ज्युनिअर कॉलेज,
कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा.
9970591697
bhokareshrijeet@gmail.com

■ ■ ■

# बाकी सगळं ठीक आहे...



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
नागपूर.
९४२२१२५६५६
७०२०३४३४२८

बाप्पा.......
तुमच्या आगमनाची बातमी मिळाली...मन आनंदाने फुलून गेले. शहर तुमच्या स्वागताच्या तयारीत गुंतले आहे. चौक-चौकात तोरणद्वार झळकत आहेत, मंडपात रंगीबेरंगी दिवे लुकलुकत आहेत आणि ढोल-ताशांच्या गजराने वातावरण दुमदुमले आहे. सगळं काही वरवर उत्सवी दिसतंय, पण यामागची खरी परिस्थिती काही औरच आहे. म्हणून तुम्हालाही थोडं कळवावं असं वाटलं... बाकी सगळं ठीक आहे.

**गणराज,**
यंदा तुमच्या स्वागताला सर्वात मोठा अडसर म्हणजे रस्ते आणि पुलांवरील खड्डे आहेत. स्थिती अशी आहे की वाहनचालकांना समजेनासं झालंय की ते रस्त्यावरून चालताहेत की एखाद्या ऑफ-रोड रॅलीत भाग घेताहेत. पुलांवरील खड्डे, गल्लीबोळातील उखडलेला डांबर आणि अधुरं काम असलेले पूल हेच जणू तुमच्या नगरप्रवेशासाठीच्या पुष्पशय्येऐवजी काट्यांचं बिछानं आहे... बाकी सगळं ठीक आहे.

**हे विघ्नहर्त्या,**
ट्रॅफिक जाम तर आता शहराचा कायमस्वरूपी उत्सवच झालाय. लोक घरापर्यंत पोहोचण्याआधीच तासन्तास रस्त्यावर अडकतात आणि तिथूनच गणपती बाप्पा मोरया चा जप सुरू करतात. बाप्पा, बाकी सगळं ठीक आहे.

**चिंताहरणा,**
राजकारणाचाही उत्सव जोशात आहे. महापालिका निवडणुकीच्या आशेने नेते गणित मांडण्यात व्यस्त आहेत. विरोधक मतांची चोरी झाल्याचं गाणं गातायत तर सत्ताधारी त्याला उलटतायत. काहीजण तर बिहारच्या मतचोरीच्या होडीत बसून आपली नैया पार लावायचं स्वप्न पाहताहेत. पण जनता? तिची होडी तर लाटांमध्ये डळमळतेय आणि तिला केवळ तुमचाच आधार हवाय. बाप्पा, या दहा दिवसांत हे सारे तुमच्या चरणी येऊन तुम्हाला चुकीची माहिती देऊन भुलवायचा प्रयत्न करतील. पण तुम्ही सावध राहा...बाकी सगळं ठीक आहे.

**बाप्पा......**
यंदा एकच विनंती... शहरात येताना ट्रॅफिक नेव्हिगेशन ॲप, हेल्मेट आणि थोडा जास्त वेळ घेऊन या. तुमची सवारी खड्ड्यांतून आणि जाममधून पार काढणं काही सोपं नाही.

आणि सर्वांत महत्वाचं – मूषक महाराजांना सडकेवर फिरताना जपून फिरायला सांगा...श्वानानना हद्दपार करण्याचे आदेश आले आहेत....त्यासाठी श्वानपथक त्यांना पकडण्यासाठी रस्त्यावर फिरत आहे....

अजून एक महत्त्वाचं... यंदा प्रसादात बुद्धी भरपूर आणा. कारण शहरातील नेत्यांना हाच प्रसाद सर्वाधिक आवश्यक आहे. लाडू-मोदक तर प्रत्येक मंडपात मिळतीलच...बाकी सगळं ठीक आहे.

हीच थोडक्यात परिस्थिती तुमच्या ध्यानात आणून दिली आहे. तुम्ही तर सिद्धी-बुद्धीचे दाता आहात. म्हणून आपल्या सोयीप्रमाणे पधारा **बाप्पा,** स्वागत नेहमीप्रमाणे मनापासूनच होईल. गणपती बाप्पा मोरया....

■ ■ ■

# नागपूरची म्युझिकल चेअर आणि खरा दोषी कोण?

दशकानुदशके ग्रामीण आणि मराठी माध्यमातील शाळा हे महाराष्ट्राच्या स्वस्त व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मेरुमणी राहिले आहेत.

१९७०-८० च्या दशकात शासनाकडे पुरेशा संसाधनांची कमतरता असतानाही अशा अनेक शाळांनी समाजाच्या देणग्या, सेवाभाव आणि अल्प शुल्काच्या (म्हणजे अवघे २० ते २००) जोरावर लाखो डॉक्टर, अभियंते, अधीकारी व वकील घडवले. परंतु आज त्या शाळाच शालार्थ घोटाळ्याच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. शिक्षण विभागाच्या चौकशीने सुरू झालेला हा प्रकार आता एक राजकीय म्युझिकल चेअर झाला आहे . दोष एकाकडून दुसऱ्यावर फिरवला जातो, पण कोणताही निर्णय निश्चित होत नाही.

**शालेय शिक्षणातील शालार्थ घोटाळा**

**दोष रोखण्यासाठी सुरू झालेला 'खेळ'**

सुरुवातीला चौकशी यंत्रणांनी सर्व दोष शिक्षण विभागावर ढकलला. नंतर तपासाचा घेर वाढवून शाळांच्या सचिव व व्यवस्थापन मंडळांवर आरोप ठेवले गेले, जरी त्यांच्या शालार्थ प्रक्रियेतील प्रत्यक्ष भूमिकेचा पुरावा नसतानाही. त्यानंतर शिक्षकांवर आणि मुख्याध्यापकांवर कारवाई करत त्यांचे पगार रोखण्यात आले.

शिक्षक हे सर्वात जवळचे व सोपे टार्गेट असल्याने त्यांच्यावर कारवाई सहज झाली. परंतु शिक्षक संघटनांच्या दबावानंतर लक्ष प्रशासकांवर वळले.

आता खरी अडचण सुरू होते. हे प्रशासक स्वतः शिक्षण विभागाशी आणि मंत्रालयीन मंजुरी प्रक्रियेशी जोडलेले असल्याने त्यांच्यावर कारवाई करणे म्हणजे शासनाने स्वतःच स्वतःविरुद्ध खटला चालवणे. त्यामुळे पुन्हा दोष शाळांवर ढकलला गेला.

आज पालकमंत्र्यांपासून काही राजकीय मंडळी शाळांचे मालमत्ता जप्तीचे इशारे देत आहेत, जणू ग्रामीण शिक्षण पद्धतीच हाच घोटाळ्याचा मूळ आहे! ही अत्यंत अन्यायकारक भूमिका आहे.

**'ड्राय डिस्ट्रिक्ट्स' आणि अधुरी चौकशी**

नागपूर विभागात २० पेक्षा अधिक अटक झाल्या असताना काही जिल्ह्यांवर अजून कोणतीही चौकशी सुरू नाही. ज्या जिल्ह्यांतून खास राजकीय हस्तक्षेप होतो, तिथे चौकशी जणू थांबवली गेली आहे – जणू काही ते ड्राय डिस्ट्रिक्ट्स आहेत आणि तिथे घोटाळाच झाला नाही!

जर शाळांचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचं एकत्रित मत नोंदवून खऱ्या दोषींवर (आयडी तयार करणारे, मंजुरी देणारे आणि प्रक्रियेला परवानगी देणारे अधिकारी) कारवाईची मागणी केली नाही, तर नेहमीप्रमाणे वरची जबाबदार मंडळी मोकाटच राहतील.



अरूण सोपानराव कराळे
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

**निष्कर्ष**

शिक्षक, मुख्याध्यापक आणि ग्रामीण शाळा या कोणत्याही राजकीय म्युझिकल चेअरचा भाग नसाव्यात. जर शासन आपल्या परस्परावलंबी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास तयार नसेल, तर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरूच राहतील आणि ग्रामीण शिक्षण संस्थांवर न केलेल्या गुन्ह्यांचे डाग कायम राहतील.

■ ■ ■

# कुत्र्यानं चाटल्यानं बाळ दगावलं



सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-एनसीआरमध्ये सर्व भटक्या कुत्र्यांना रस्त्यावरून डॉग शेल्टर होममध्ये पाठवण्याचे आदेश दिले. त्याविरोधात लोक रस्त्यावर उतरले. पण याचवेळी एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. कुत्रा चावल्याने वेळेवर इलाज न झाल्यास काय होते, याचे वृत्त तुम्ही वाचले अथवा पाहिले असतील. पण कुत्र्याने दोन वर्षांच्या बाळाच्या जखमेला चाटल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. अदनान नावाच्या २ वर्षांच्या मुलाचा रेबीजमुळे मृत्यू ओढावला. या कुत्र्याने बाळाची एक जखम जिभेने चाटली होती. कुटुंबाने त्याकडे दुर्लक्ष केले. हा हलगर्जीपणा मुलाच्या जीवावर उठला.

**कुत्र्याने चाटली जखम**

कुत्र्याने एक महिन्यापूर्वी मोहम्मद अदनान याच्या पायावर एक जखम झाली होती. ती कुत्र्याने चाटली होती. त्यानंतर हा मुलगा पाण्याला घाबरायला लागला आणि त्याने पाणी पिणेच बंद केल्याने कुटुंबाला संशय गेला. या लक्षणाला हायड्रोफोबिया म्हणतात. मुलाची तब्येत बिघडल्यावर त्याला सार्वजनिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तिथे दुसऱ्या दिवशीच हे मुल दगावले.

या घटनेने कुटुंबालाच नाही तर त्या परिसराला मोठा धक्का बसला. या गावातील जवळपास दोन डझन लोकांना रुग्णालयात आणून त्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांचं पथक या गावात पोहचले आणि त्यांनी रेबिजची कारणं, लक्षणं,परिणाम आणि उपायांची माहिती दिली.

उत्तर प्रदेशातील बदायू जिल्ह्यातील गावात ही घटना घडली. त्यानंतर डॉक्टरांचे पथक गावात दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांना रेबिजची माहिती दिली. केवळ कुत्रा चावल्यानेच नाही तर कुत्रा चाटल्याने सुद्धा रेबीजचा धोका होऊ शकतो असा दावा त्यांनी केला. त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. या गोष्टींकडे कानाडोळा करू नका असा दावा त्यांनी केला. अशा प्रसंगात लागलीच रेबीजचे इंजेक्शन घ्यावे असा सल्ला डॉक्टरांनी दिला.

**रेबीज काय आहे?**

रेबीज एक असा आजार आहे, जो मेंदू आणि मज्जासंस्थेला प्रभावित करतो. हा आजार जीवाणूंमुळे होतो. त्याचे नाव रॅपटो व्हायरस असे आहे. कुत्रा चावला अथवा तो चाटला जरी तरी त्यामुळे हा आजार पसरतो. अशा आजारामुळे मृत्यू पण ओढावू शकतो.

कुत्र्याच्या लाळेत रेबिज व्हायरस असू शकतो. हा व्हायरस जखम, मेम्ब्रेन (डोळे, तोंड, नाक) यांच्या संपर्कात आल्यावर मनुष्यात संक्रमित होऊ शकतो आणि त्यामुळे जीव जाऊ शकतो.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### सर्जा राजाचे मनोगत..!

लम्पीमुळे आमच्या
सणावर पडलं विरजन
यांत्रिक युगामुळे
आमचीही झाली घसरण..!

अतिवृष्टी ढग फुटीने
पिकांची झाली धुळधाण
दुबार पेरणीने, मालका
तुझ्यात राहीला नाही त्राण..!

शासन आहे वाचाळ-
नुसतेच पंचनामे करतात
पाठीराखा म्हणून ऑनस्पॉट
बांधावर मदत कुठे देतात ?

# फिर्यादीच्या घरात घुसून शिवीगाळ, विनयभंग व धमक्या;आरोपींची शहरात वरात

**■मुर्तिजापुर,दि २१ (प्रतिनिधी) :**
तालुक्यातील टेलिफोन स्टेशन विभागात २० ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ९.३० वाजता घडलेल्या धक्कादायक घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. फिर्यादी सौ. निशा वैभव भगत घरी असताना आरोपी सनी विजय दुबे (२४), वैभव संतोष कोकाटे (२२), योगेश उर्फ आदित्य कोकाटे, यश अनिल चन्ना केसले (२०) व आकाश वासुदेवराव उईके (३२) (सर्व रा. सत्संग भवन परिसर, मुर्तीजापुर) यांनी घरात घुसून अश्लील भाषेत शिवीगाळ केली, फिर्यादीचा विनयभंग केला तसेच फिर्यादीच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

फिर्यादीच्या तक्रारीवरून मुर्तीजापुर शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र. ३९९/२५ भा.न्या.सं. कलम ७४, १८९(२), १८९(४), १९०, १९१(१), १९१(२), २९६, ३३३,



३५१(३) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. घटनेनंतर पोलिसांनी वीजेच्या गतीने सणसणाटी कारवाई करत तीन आरोपींना मुर्तीजापुर येथून, तर उर्वरित दोघांना बडनेरा (अमरावती) येथून जेरबंद केले.अटकेनंतर पोलिसांनी आरोपींना शहरातून भारी पोलिस बंदोबस्तात काढलेल्या वरातीने शहरात प्रचंड खळबळ माजवली. यावेळी आरोपी पोलिसांसमोर ढ्ढइसके बाद झगडे करूँगा नाही, माफी करा! अशी गयावया करत होते. हा नजारा पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली होती.

# बळीराजाच्या पोळा सणावर अतिवृष्टी,ढगफुटीचे सावट

**■कुटासा महसूल मंडळात ओला दुष्काळ जाहीर करा.बळीराजाची मागणी**





**■कुटासा,दि २१ (प्रतिनिधी) :**
ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या बैलपोळा उत्सवाच्या तयारीला बळीराजा बऱ्याच दिवसापासून लागला असुन दरवर्षी बळीराजाच्या घरो घरी पोळा सणाची लगबग दिसून येते. यावर्षी मात्र सतत पाऊस सुरु असल्याने ही लगबग कमी झाल्याचे दिसून आले आहे.शेतकरी बांधव मोठ्या उत्साहात हा सण साजरा करतात परंतु गेल्या काही दिवसापासून कुटासा परीसरात ढग फुटी,अतिवृष्टी,सारखा पाऊस पडल्याने शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. पावसाच्या सावटाने शेतकऱ्यांच्या शेतातील कपाशी पिकांचे मोठे नुकसान झाले असुन पावसामुळे शेती पिक खरडून तर काही शेतातील पिक हे अति पावसामुळे सुकून गेले येवढा मोठा खर्च केला की या वर्षी तरी पिक चांगले होईल. या आशेने शेतकरी कर्जबाजारी होऊन पिकांना महागडी खते महागडी फवारणी देऊन पिके चांगल्या अवस्थेत आनली परंतु परीसरात काही दिवसापासून धो धो पाऊस पडल्याने शेतकऱ्यांच्या सप्नावर मात्र पाणी फेरले आधीच शेतकरी दुबार तिबार पेरणीच्या संकटाला सामोरे जाऊन पेरणी केली व आता पावसाने सर्व काही नष्ट केले. त्यामुळे यावर्षी शेतकरी राज्याच्या पोळा सणावर ढगफुटी, अतिवृष्टी, सारख्या पावसाने संकट ओढवले आहे.

## डॉ.वंदनाताई जगन्नाथ ढोणे आयुर्वेद महाविद्यालयात शारीर रचना विभागाच्या वतीने अवयव दान सप्ताहाचे आयोजन !

**पातुर** : येथील आमदार डॉ.राहुल पाटील शैक्षणिक संकुलातील ,डॉ.वंदनाताई जगन्नाथ ढोणे आयुर्वेद महाविद्यालयात शरीर रचना विभागाच्या वतीने अवयव दान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी विविध कार्यक्रमाची रेलचेल होती दिनांक ३ ऑगस्ट २५ ते १५ ऑगस्ट २५ दरम्यान अवयव दान सप्ताह महाविद्यालयात साजरा करण्यात आला.दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी अवयव दान प्रदर्शनी चे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. साजिद शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ जयश्री काटोले ,शारीरिकरचना विभागाचे प्रमुख डॉक्टर अभय भुसकडे, डॉ रूपाली शेळके ,डॉ नवीन शेख प्रामुख्याने उपस्थित होते. या सप्ताहामध्ये विभाग प्रमुख अभय भुस्कडे यांनी अवयवानाचे महत्त्व विशद करून त्यातील वैज्ञानिक तथ्य जागतिक स्तरावर अवयव दानाची गरज याविषयी मार्गदर्शन केले .

# शिखा मोदींच्या मंगलपाठात चुनरी उत्सव

**■महिलांची गर्दी,शुक्रवारी दादीचा मुख्य उत्सव**

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**
स्थानिक राणी सती धाममध्ये राणी सती दादींच्या वार्षिक भादवा बदी उत्सवात शिवनी जबलपूरच्या शिखा मोदींचा भव्य संगीतमय मंगलपाठ संपन्न झाला.

ज्यामध्ये लाल रंगाच्या वेशभूषेत असलेल्या महिलांनी सामूहिक घुमर नृत्य व चुनरी उत्सव सादर करीत जल्लोष निर्माण केला. या महोत्सवात शिखा मोदींनी त्यांच्या संगीतमय मंगलपाठातून दादीची अवतारकथा सादर करीत भक्तीभाव निर्माण केला.

रिंकू चौबे, वर्धा यांनी भक्तीगीते सादर केलीत.स्व कमलादेवी द्वा अग्रवाल बोरगाववाले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या कार्यक्रमाचे यजमान पंकज द्वा अग्रवाल होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला गायिका शिखा मोदी यांचे स्वागत राणी सती धामचे अध्यक्ष जगदीश बाछुका, नवीन झुनझुनवाला,पवन बाछुका यांनी केले. दादीचा मुख्य उत्सव शुक्रवार २२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. या पवित्र उत्सवानिमित्त दुपारी २ वाजता हवन आणि सायंकाळी ६-४५ वाजता भव्य छप्पन भोग दर्शनाचा कार्यक्रम होणार आहे.

शनिवार, २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९-३० वाजता सुंदरकांड होणार असून दुपारी अमावस्यानिमित्त दिवसभर महिलांचा सामूहिक मंगलपाठ व जात पूजा, अर्चनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# दिव्यांग सोशल फाउंडेशनच्या संगीतमय प्रस्तुतीने श्रोते मंत्रमुग्ध

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**
स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या माध्यमाने डॉ. विशाल कोरडे यांच्या मार्गदर्शनात दिव्यांगांसाठी विविध सामाजिक उपक्रम संपूर्ण भारतभर राबवले जात आहेत. दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा परिषद कर्मचारी भवन येथे लायन्स क्लब सुप्रीम पुणे व इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला तर्फे दिव्यांग बांधवांना जयपूर फूट व विविध साहित्याचे वाटप करण्यात आले . सदर कार्यक्रमात श्री. शिवाजी महाविद्यालयाचे डॉ.विशाल कोरडे यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली हमको मन की शक्ती देना, श्रद्धा विश्वास की भक्ति देना हे प्रेरणा गीत दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला च्या सदस्यांनी प्रस्तुत केले . प्रेरणा गीताला सहगायन अनामिका देशपांडे ,अस्मिता मिश्रा व तन्वी दळवे यांनी केले .बासरीची साथ संगत पंडित हरिप्रसाद चौरसिया यांची विद्यार्थिनी डॉ.मोना तिडके , तबल्याची साथ संगत ओम वैद्य यांनी तर तांत्रिक सहकार्य गणेश



सोळंके यांचे लाभले . या कार्यक्रमाला प्रामुख्याने अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ऍडव्होकेट आशिष भाऊ फुंडकर ,आमदार वसंतराव खंडेलवाल ,हरीश पिंपळे ,रणधीर भाऊ सावरकर ,डॉ. किशोर मालोकार व मान्यवरांची उपस्थिती होती . डॉ. विशाल कोरडे यांनी लिहिलेल्या प्रेरणा गीताला उपस्थित मान्यवरांनी व श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.

## निधन वार्ता

### संतोष गायगोळ



**अकोला :** तालुक्यातील वखापुर येथील मूळचे व सध्या जुने शहर डाबकी रोडवरील नंदाने मंगल कार्यालयाजवळ वास्तव्यास असलेले प्रतिष्ठित नागरिक, दैनिक अजिंक्य भारतचे मुद्रित शोधक तसेच संभाजी ब्रिगेडचे सक्रिय पदाधिकारी श्री. संतोष तुकाराम गायगोळ (५२) यांचे गुरुवारी, दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन बहिणी असा आप्त परिवार आहे.श्री. गायगोळ यांचे पार्थिवाचे अंत्यसंस्कार शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता जुने शहरातील गुलजारपुरा मोक्षधाम येथे करण्यात येणार आहेत. सर्वांच्या मनात हसतमुख, प्रेमळ व मदतीला तत्पर अशी ओळख निर्माण करणाऱ्या संतोष गायगोळ यांच्या अकस्मात निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.

# स्व.भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंती निमित्त जलाभिषेक

**■बाळापुर,दि २१ (प्रतिनिधी) :**
कृषिमंत्री लोकनेते स्वर्गीय ना.भाऊसाहेब उर्फ पांडुरंगजी फुंडकर यांच्या जयंतीनिमित्त निळकंठेश्वर संस्थान निमकर्दा येथे जलाभिषेक ,महाआरती तथा भाऊसाहेब यांच्या प्रतिमेची पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बाळापुर ग्रामीण अध्यक्ष किशोरभाऊ कुचके,जिल्हा जिल्हा सचिव विलास पोटे, सरचिटणीस राजेश्वर वैराळे,योगेश भाऊ पटोकार, महिला आघाडीच्या ज्योतीताई ताले, आशाताई कोकाटे, हेमाबाई पाथरकर,निळकंठेश्वर संस्थानचे नितीन पाटील खेळकर,सुधाकर पाटील खेळकर, मा. जि.प सदस्य विलास इंगळे,दिलीप पटोकार,तालुका उपाध्यक्ष बंडू पाटील माळी, युवा मोर्चाचे योगेश भाऊ ढोरे, ऋषी ताथोड, जि.प.सर्कल प्रमुख अजिंक्य राऊत,मंगेश भरणे, जगन्नाथ



पथारकर, वैद्यकीय आघाडीचे प्रशांत पाटील माळी, निमकार्दा गावचे सरपंच सचिन जाम ोद, विठ्ठल दही, भरत राऊत, सोशल मीडिया चे तुषार ताले, संजय साबळे,प्रमोद वानखडे, रमेश मांगटे,शिवाजी मांगेट,बंटी उमाळे, गजाननराव खेळकर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात रामदेवबाबा जन्मोत्सवाचे आयोजन

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**
लाखो भक्तांचे तारणहार रामसापीर राम देवबाबा यांच्या भादवा सुदी दुजच्या शुभ प्रसंगी पवित्र जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीतर्फे स्थानिक गीता नगर येथील राम देवबाबा-श्यामबाबा मंदिरात २५ ऑगस्ट ते २ सप्टेंबर दरम्यान रामदेवबाबा यांचा हा भादवा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये जम्मा जागरण, भजन संध्या, दैनिक सामूहिक महाआरती, दिव्य रोषणाई, सजावट, अभिषेक होईल. रामदेवबाबा हे राजस्थानातील पोखरण येथील राजा अजम लजी यांच्या घरी प्रकट झालेले भगवान कृष्णाचे रूप आहे. ६८७ वर्षांपूर्वी पोखरणम ध्ये रामदेवबाबा प्रकट झाले. कलियुगात वाढती सामाजिक विषमता, जातीयवाद आणि सामाजिक भेदभाव नष्ट करून सामाजिक सौहार्द आणि सौहार्द प्रस्थापित करण्यासाठी भगवान रामदेवबाबा यांच्या रूपात जन्माला आले. बाबांनी त्यांच्या भक्तांना चमत्कार



दिलेत, म्हणजेच परचे दिलीत, जी प्रत्येक जम्मा जागरण उत्सवात गायली जातात. बाबांनी त्यांच्या अवतार काळात केलेले २४ परचे, म्हणजेच चमत्कार असून ती त्यांच्या भक्तांना माहिती आहेत. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी रामदेव बाबांनी नवीन ऋणिचा धाम स्थापन करून समता स्थापित केली. आजही बाबांनी ज्या पायऱ्यांवर चम त्कार केले ती विहीर, राम सरोवर आणि बाबा जेथे समाधीत गेले ते त्यांच्या अवताराची साक्ष देतात. महानगरातील रामदेवबाबा सेवा समितीने जुन्या कॉटन मार्केट मध्ये हा उत्सव साजरा करण्याची परंपरा गेल्या ५५ वर्षांपासून अखंडपणे जोपासली आहे. ही परंपरा अजूनही सुरळीतपणे सुरू आहे. हा उत्सव २५ ऑगस्ट, शनिवारपासून रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात सुरू होईल. या दिवशी सकाळी ९-१५ वाजता बाबांचे पगल्या पूजन, आरती होईल आणि सकाळी ११-१५ वाजता दिव्य ज्योत दर्शन ने हा उत्सव सुरू होईल. सायंकाळी ४ वाजता भजन गायक गोपाल शर्मा हारे यांच्या भव्य संगीतमय जुम्मा जागरण कार्यक्रमाने सत्राचा समारोप होईल. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शासकीय रुग्णालयात उत्सव निमि त्त रुग्णांसाठी अन्नदानाचा कार्यक्रम होईल. २ सप्टेंबर, भादवा सुदी दशमी रोजी सायंकाळी ७ वाजता गायिका सौ निधी मंत्री यांच्या भव्य भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी रामदेवबाबा भक्तांना या उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आणि उत्सवात सामील होण्याचे आवाहन केले.

## निधन वार्ता

### धोंडूराम रोठे



**तेल्हारा :** येथील गायत्री नगरातील रहिवाशी तथा दि. अकोला- वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि;अकोला शाखा तेल्हारा, दानापूर मधील सेवानिवृत्त शाखाधिकारी प्रल्हाद उर्फ बंडूभाऊ रोठे यांचे वडील धोंडीराम रोठे यांचे गुरुवार दि २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता वयाच्या ८७व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. आज शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता गायत्री नगर तेल्हारा येथील त्यांचे निवासस्थानावरून त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. स्वर्गीय धोंडूराम रोठे हे गुरुदेव सेवा मंडळाचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले, दोन मुली , सुना, नातवंडेअसा बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# सोसायट्यांचे कामकाजात सहभाग वाढवून सोसायट्या बळकट करा : डॉ.संतोषकुमार कोरपे

## जिल्हा बँकेची ११४ वी वार्षिक आमसभा संपन्न

**■अकोला,दि २१ (प्रतिनिधी) :**
सेवा सहकारी सोसायट्यांनी आपल्या स्तरावरुन कामकाजात सहभाग वाढवून सोसायट्यांचे बळकटीकरण करावे. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांच्यात समन्वय ठेवून सोसायटी ग्राहकाभिमुख करण्याची तसेच व्यवहार चोख व पारदर्शी करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष, डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी येथे केले. जिल्हा बँकेची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १७.०८.२०२५ रोजी पार पडली यावेळी ते बोलत होते. ते पुढे बोलतांना म्हणाले की, प्रत्येक गावात बँक उभी करण्याचा अट्टाहास नको. त्यासाठी बँकेने मायक्रो एटीएम ची व्यवस्था सुरु केली आहे. या योजने अंतर्गत प्रत्येक गावात अधिकृत बँक मित्र असेल त्यांच्या मार्फत आर्थिक व्यवहार करता येतील.

प्रत्यक्ष बँकेत जाण्याची गरज राहणार नाही. याशिवाय आता आपल्या गावाला एम.एस. ई बी.च्या विद्युत पुरवठ्यावर विसंबून ठेवू नका यासाठी बँकेने ग्रामीण सुर्यघर योजना सुरु केली आहे. सुर्यापासून विद्युत तयार करणारी ती योजना आहे. त्यामुळे विद्युत निर्माण तर होईलच शिवाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यात मदत होईल. यापुर्वी बँकेने राबविलेल्या सोलर योजने अंतर्गत अनेकांनी घरीच विज निर्माण केली असुन, एम.एस.ई.बी.ला



पर्याय उभा केला आहे. यासाठी बँकेने अल्प दरात कर्जपुरवठा सुरु केला आहे असे डॉ.कोरपे यांनी सांगीतले.सोसायट्यांचे जे सभासद १० वर्षापासून थकीत आहे अशा सभासदांना मुख्य प्रवाहात आणणे करिता सोसायटीने शेतकऱ्यांचे फायद्याची ओटीएस योजना आणली असुन या योजनेत केवळ मुद्दल भरुन नवीन कर्ज घेणेस शेतकरी पात्र होणार आहे. सोसायट्यांना या योजनेत व्याजात लागणारी आर्थिक तुट जिल्हा बँकेचे सहकार्याने भरुन काढली जाणार असल्याने या योजनेचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना करुन द्यावा असे आवाहन त्यांनी या प्रसंगी केले. याशिवाय विकासात्मक कर्जे, ड्रिप इरिगेशन ईत्यादी योजना ही बँक राबवित असुन अल्प व्याज दरात पतपुरवठा केला जात असल्याचे डॉ. कोरपे म्हणाले.दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक्सब असोसिएशनने बँकेचे अध्यक्ष डॉ.संतोषकुम ार कोरपे यांना कै.विष्णु अण्णा पाटील जीवन गौरव पुरस्काराने गौरविले आहे. या पुरस्काराबद्दल वार्षिक आमसभेत बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांचा बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने तथा सेवा सहकारी सोसायटीचे व इतरही भागधारक संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. आमसभेच्या आरंभी मागील वर्षात पंचतत्वात विलीन झालेल्या थोर विभुतिंना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. अहवाल वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांनी केले. तसेच आमसभेला बँकेचे उपाध्यक्ष श्रीधरराव कानकिरड, बँकेचे माजी अध्यक्ष तथा संचालक रमेशराव हिंगणकर, डॉ. सुभाषचंद्र कोरपे, माजी उपाध्यक्ष तथा संचालक वामनराव देशमुख, माजी राज्यमंत्री तथा संचालक सुभाषराव ठाकरे, आमदार तथा संचालक अमितराव झनक, संचालक शिरीष धोत्रे, रामसिंग जाधव, राजेश राऊत, दामोदर काकड, महादेवराव काकडे, जगदिश पाचपोर, उमेशराव ठाकरे, अंबादास तेलगोटे, श्रीमती मंदाताई चौधरी, श्रीमती भारतीताई गावंडे, सौ.रुपालीताई खारोडे आदि उपस्थिथ होते.

डॉ. जयराज कोरपे, बँकेचे माजी संचालक हिदायतउल्लाखॉ पटेल कर्मचारी प्रतिनिधी के. पी.लहाने, ओ.बी.माहोरे, बँकेचे विशेष कार्याधिकारी पी. एन. उकंडे, एस.बी.झळके, सहा.व्यवस्थापक बी. टी. पारधी, मुख्याधिकारी सौ. एम. ओ. भेंडे, सी. बी. गोरेगांवकर यांचेसह सहकारी संस्थेचे प्रतिनिधी व संघाचे अधिकारी, गटसचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पशुपालकांनी किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ घ्यावा

**अकोला :** पशुधनाच्या आहार, उपचार, विमा आदी संगोपनासाठी किसान क्रेडिट कार्डाआधारे अल्पकालीन कर्ज मिळते. या योजनेचा जिल्ह्यातील पशुपालक बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.पशुधनाचा आहार, वैद्यकीय उपचार, विमा, वीजपुरवठा, इन्व्हर्टर आदी बाबींसाठी खेळते भांडवल म्हणून पशुधनावर १ लक्ष ६० हजार रू. पर्यंत अल्पकालीन कर्ज, तर शेतीवर ३ लक्ष रू. पर्यंत कर्ज मिळू शकते.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport No is - **(M5343942)**
-------From----------
**RAKESH KUMAR JAGDISHCHANDRA PANCHMIA**
---------TO------------
**RAKESH JAGDISH PANCHAMIA**
My Residential Address is - Hansraj Towers wing B6 opposite Amrutwadi plot Akola 444001.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# महासागर विविधा...

## आजच्या महाराष्ट्राचा सार्वजनिक सण बैल पोळा

श्रावणी अमावास्या उर्फ बैल पोळा हा दिवस संपूर्ण महाराष्ट्राचा एक एकात्मिक सार्वजनिक सण म्हणून मानला जातो.

मुळात हा एक कृतज्ञता सोहळा आहे. जो प्राणी हा आपल्या गोमातेचा पुत्र आहे, ज्याच्या आधारे आपण आपली शेती नांगरणी, डवरणी, वखरणी, पेरणी आदी कृषिकर्मे, बैलगाडी द्वारे आपला प्रवास, मालाची ने आण करतो, तेलाच्या घाण्यापासून चून्याच्या घाण्या पर्यंतची कामे बिनबोभाट करवितो,

आपल्या मनोरंजनास त्याला शंकरपटात सुसाट पळवितो. प्राचीन काळा पासून प्रत्येक जाती जमातीस हक्काचा साथीदार असलेल्या त्या मुक्या प्राण्या बद्दल म्हणजेच बैलाबद्दल कृतज्ञता, दर्शविण्यासाठी आपल्या भारतीय संस्कृतीने हा सण साजरा करणे सुरू केले. वर्षभर आपण आपल्या मर्जीप्रमाणे ज्याला ताबडुन घेतले, त्याचे निदान ह्या एका दिवशी कोड कौतुक करावे, त्याला एकाच का होईना पण ह्या दिवशी पूर्णतः विश्रांती देण्यात यावी हाच उद्देश ह्याच्या मागे होता.



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड, नागपूर.



मात्र हळू हळू त्या बिचाऱ्या मुक्या प्राण्याच्या लाडाचे आणि विश्रांतीचे उद्देश मागे पडत गेले आणि लोकांनी नेमके याच पोळ्याच्या दिवशीच पोळा फुटताच त्यांच्यात जोराने धावण्याची रेस लावणे सुरू केले.

आपण आपल्या बैलांना एक निर्जीव वस्तू मानून त्यांच्या शरीराची रंग रंगोटी सुरू केली. त्याला मनसोक्त पाण्यात डुंबण्यास वेळ न देता आपणच त्याला आपल्या मनाप्रमाणे खरारा करून पाण्याबाहेर काढून रंगरंगोटीस घेऊन जातो. का? का? का?

कारण त्या बिचाऱ्या बैलासह्ल आपण स्वत्वच ठेवलेले नाही. या बैल नावाच्या प्राण्या बाबत कृतज्ञता म्हणून सुरवात केलेला हा सण त्याच्या बद्दल काहीही माहिती न घेता, जे माणसाला आवडते, ते त्यालाही आवडतेच ह्या आधारावर सुरू आहे.

नैसर्गिक दृष्ट्या बैलाला हिरवे गवत, झुडपी पाला, कडबा, कुटार, ढेप, हे त्यांचे नैसर्गिक अन्न या दिवशी त्याला खायला देण्याच्या ऐवजी, माणसाला आवडणारे पुरणपोळी, वडे, असले अन्न त्याला खाऊ घालण्यात येते.

खरेतर गाय गो, म्हणजे गोमातेला झालेले पुल्लिंगी वासरू हेच सर्वसाधारण पूजनीय मानले गेलेले आहे. त्याचा संबंध, भगवान शिवाचे वाहन नंदी देव यांच्यासोबत जोडले गेले आहे. पण हे सोयिस्कर पणे विसरले जाते, की श्री नंदी महाराज हे पूर्णतः पौरुष युक्त असे वळू किंवा सांड स्वरुपात आहेत. बैल नाहीत. जेव्हा वळूचे खच्चीकरण करून त्यास पुनरोत्पादना पासून वंचित केल्या जाऊन त्यास बैल बनविल्या जाते, तेव्हाच तो मानवाचा गुलाम बनू शकतो. वळूस गुलाम बनविणे एव्हढे सहज नाही.

आज बघता, देशातील ट्रॅक्टर उत्पादन करणाऱ्या कंपन्यांच्या मार्केटिंग रिपोर्ट नुसार आज मितीला अठरा टक्के किसान शेतीच्या कामांसाठी बैलजोडी ऐवजी ट्रॅक्टर वापरतात. उर्वरित शेतकरी, किसान हे अल्पभूधारक व मध्यम भूधारक शेतकऱ्यांना सरकारच्या भरपूर कृषी यंत्र सामग्री बँक, सारख्या योजनांद्वारे केंद्र सरकार ६०% आणि राज्य सरकार ४०% आर्थिक मदत देऊन ट्रॅक्टर खरेदीला उत्तेजन देत आहे. त्यामुळे भाडे तत्वावर बैल जोडी घेणारे अल्पभूधारक शेतकरी देखील बैल जोडी विकत घेण्याची क्षमता नसल्याने व जरी विकत घेतली तरी त्यांचे पालन पोषण करण्याची ऐपत नसल्याने, त्यांचेकडे देखील बैलांची संख्या रोडावली आहे.

असे देखील ऐकण्यात आलेले आहे की, काही गोधन पालकांनी देखील, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे, आपल्या गर्भार गायींना कालवड होणार असेल तरच तिचे नीट संगोपन करणे सुरू ठेवले आहे. जर अर्भक पुल्लिंगी गोऱ्हा उर्फ वळू असेल तर मात्र, केवळ रेतनास उपयुक्त एखाद दुसरे अर्भक जन्मास घालू लागले आहेत. बाकी नकोसे. मात्र बैल बणणारे असल्याने, त्यांची मागणी घटल्याने त्यांस जन्मापूर्वीच हटविल्या जात आहे. किती दैव दुर्विलास!

महाराष्ट्रात खिल्लारी, देवणी, लाल कंधारी, गवलाऊ, कर्नाटकी, इत्यादी मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणाऱ्या बैलांच्या प्रजाती मानल्या गेल्या आहेत. परंतु मुख्यातः जे शेतकरी अजूनही पारंपरिक शेती करतात त्यांच्याच कडे बैलजोड्या आहेत. परंतू नवीन पिढीतील शेतकरी बांधव, हे यंत्रिकी शेतीकडे वळू लागल्याने बैलांची मागणी आणि महत्व कमी होऊ लागले आहे.

आज मात्र आपण आपल्या ह्या परंपरेने हजारो पिढ्या सेवारत असणाऱ्या आपल्या लाडक्या अश्या ह्या सर्जा राजा, ढवळ्या पावळ्या यांच्या योगदाना बद्दल त्यांचे कधीही न फिटणारे उपकार स्मरून कृतज्ञता व्यक्त करून त्यांच्याच पसंतीचा पोळा साजरा करुयात.

■ ■ ■

## बैलपोळा राहिला आता नावालाच! उत्सव की उरलेली केवळ आठवण?

भारत हा कृषिप्रधान देश हे वाक्य आपण इतक्या सहजतेने उच्चारतो की ते जणू प्रार्थनाच ठरते. पण प्रार्थनेचा स्वर आणि वास्तवाचा नाद अनेकदा एकमेकांशी मेळ खात नाही. आज सोशल मीडियाच्या रंगीबेरंगी शुभेच्छांमध्ये बैलपोळा झळकत असला, तरी गावोगावच्या गोठ्यांत, शेतशिवारात आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात मात्र बैलाचा खरा नाद ओसरताना दिसतो. उत्सव टिकून आहे; परंपरेचा प्राण हरवत चालला आहे.



**शेतकऱ्याचा जीवाभावाचा साथी**

एकेकाळी पहाटे पहाटे बैलांच्या घुंगरांचा मंद नाद, ओलसर मातीतल्या नांगराच्या रेषा, आणि शेतकऱ्याच्या कपाळावरील समाधान–हीच तर ग्रामीण भारताची पहाट होती. पोळ्याच्या दिवशी बैलांना रंग, कडे, फुले, तूप-तेल, कुंकू-हळद, आरती...या साऱ्यातून शेतकरी आपल्या सोबत्याला नम्र कृतज्ञता व्यक्त करीत असे. बैल हा फक्त उपजीविकेचा साधनसाठा नव्हता; तो श्रमसंस्कृतीचा साक्षात प्रतीक, पेरणीपासून कापणीपर्यंतचा अविभाज्य सहकारी होता.

**ट्रॅक्टरच्या गर्जनेत हरवलेला घुंगरांचा नाद**

आधुनिकतेच्या वेगात गावागावांत ट्रॅक्टर आले; त्यांचे फायदेही आहेत वेग, परिघ, आणि काही ठिकाणी कार्यक्षमता. पण याच वेगाने गोठे ओस पडले, जुंपण्याच्या विहिरी थंडावल्या, आणि बैलांचा मागोवा हरवला. आज अनेक शेतक?यांकडे बैलच उरलेला नाही .गावोगावच्या गायवाड्यांची कडी जणू कालपटाने बंद झाली आहे. पोळ्याच्या दिवशीच तो खरा नायक सोहळ्यात दिसतो; उर्वरित वर्षभर मात्र त्याचे अस्तित्व शोधावे लागते.

**नैसर्गिक शेतीचा कणा मोडल्यावर वाढलेला खर्च**

बैल आणि गाय या दोन्हींपासून मिळणारे शेणखत मातीचं अन्न. गोवर, गोमूत्र, शेणखत, कुरणातील जैवविविधता या साऱ्यांनी शेतमातीत दीर्घकाळ सुपीकता आणि पोत टिकवली. बैल कमी झाले तसे नैसर्गिक खताचा पुरवठा कमी झाला. परिणामी रासायनिक खतं, औषधं, बियाणं यांवर अवलंबित्व वाढलं आणि शेतीचा खर्च फुगत गेला. शेतकऱ्याच्या हिशेबातील मोठा वाटा आता उत्पन्न काढण्याच्या खर्चातच खर्च होतो.

**वास्तवाची चपराक :**

शेतीचा खर्च वाढतो, पण शेतमालाला हमीभाव/न्याय्य भाव मात्र बहुतेकदा मिळत नाही. उत्पादनाचे बोझे शेतकरी उचलतो, नफ्याची कडा मात्र बाजारखेळी घेतो.

**माती, पाणी आणि मन:स्थिती तिहेरी ताण**

माती : सततच्या रसायनांमुळे मातीचा पोत आणि सूक्ष्मजीवसृष्टी बाधित होते. शेणखताच्या अभावाने मातीचा ह्यजीवह्ल कोरडा पडतो.

पाणी : नैसर्गिक सेंद्रिय पद्धती मातीला पाणी धरून ठेवण्याची ताकद देतात. ती कमी झाली की पाण्याची मागणी-पुरवठा असंतुलित होतो.

मनः खर्च, अनिश्चित बाजारभाव, हवामानातील अनिश्चितता या सर्वांचा मानसिक ताण वाढतो आणि काही ठिकाणी त्याची परिणती शोकांतिका ठरते. आपण संवेदनशील समाज म्हणून या वेदनेला केवळ आकडे म्हणत दूर करू शकत नाही.

गजानन कुसुम ओंकार हरणे
लेखक, कवी, साहित्यिक, वक्ता, समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

**बैल वाचवा – शेती वाचेल**

**शेती वाचवा – शेतकरी वाचेल**

हे सूत्रवाक्य जणू आजच्या काळाची गरज आहे. बैल म्हणजे केवळ परंपरेचा अवशेष नाही; तो शाश्वत शेतीचा जिवंत पर्याय आहे. कमी खर्च, मातीचा पोत-सुपीकता, जीवसृष्टीचा संतुलन या साऱ्यांसाठी बैलावर आधारित शेती आजही उपयुक्त आहे. पोळ्याच्या दिवशीच्या शुभेच्छा अर्थपूर्ण करायच्या असतील, तर त्या शुभेच्छांना कृतीची जोड द्यायलाच हवी.

**काय करावे? – कृतीसूची**

**(अ) शेतकऱ्यांसाठी**

मिश्र पद्धतीचा अवलंबः ट्रॅक्टर आवश्यकतेनुसार; परंतु पेरणी, आंतरमशागत, हलकी मशागत यासाठी बैलांचा वापर वाढवणे.

नैसर्गिक/सेंद्रिय इनपुट्सः गोठ्यावर आधारित गोबर-गॅस, शेणखत, जीवामृत, घनजिवामृत, अॅग्रो-वेस्ट कंपोस्ट यांचा समन्वय.

स्थानिक बियांची जपणूकः प्रदेशानुरूप पारंपरिक जातींची निवड; सहनशक्ती अधिक, खर्च कमी.

शेतस्तरावरील सहकारः गावपातळीवर बैल-शेअरिंग किंवा सामायिक जुंपण केंद्र सुरू करून परस्परांची गरज भागवणे.

**(आ) समाजासाठी**

बैल दत्तक उपक्रमः गावाने किंवा गावकऱ्यांनी एखादा बैल/जोड़ी दत्तक घेणे; त्याचे चारा, वैद्यकीय काळजी सामूहिकरित्या पाहणे.

गायवाडे पुन्हा सजीवः ग्रामपंचायत/मंडळांच्या माध्यमातून सामुदायिक गोठे, स्वच्छता, चारा बँक.

शिक्षण-प्रबोधनः शाळा, महाविद्यालये आणि भाऊंच्या मंडळांमध्ये बैलपोळ्याचा इतिहास, शाश्वत शेतीचे महत्त्व याविषयी सातत्यपूर्ण कार्यक्रम.

**(इ) शासनासाठी**

बैलपालन प्रोत्साहनः बैल-जोड़ी खरेदी, लसीकरण, विमा, चारा-सहाय्य, पशुवैद्यकीय मोबाईल क्लिनिकसाठी ठोस योजना.

सेंद्रिय इनपुट्सला साथः गोबर-गॅस प्लँट, कंपोस्ट युनिट्स, गोशाळा यांसाठी अनुदान व सोपी कर्ज-व्यवस्था.

बाजारव्यवस्थेची सुधारणाः शेतमालाला व्यवहार्य किमान आधार; थेट विक्रीचे सक्षम व्यासपीठ; साठवणूक आणि प्रक्रियेसाठी ग्रामीण हब.

कौशल्य-विकासः पारंपरिक साधनसामुग्रीचे आधुनिकीकरण–हलके, टिकाऊ नांगर, गवती फावडे, आंतरमशागत यंत्रणेचे स्थानिक निर्मिती-केंद्र.

**परंपरा आणि तंत्रज्ञान यांचा सेतू**

प्रश्न परंपरा बनाम तंत्रज्ञान असा नाही; प्रश्न समन्वयाचा आहे. जिथे वेग आणि मोठा परिघ हवा तिथे यंत्रं; जिथे मातीचा पोत टिकवणे, खर्च आवरणे, जैवविविधतेचा सन्मान करणे आवश्यक आहे तिथे बैल आणि नैसर्गिक पद्धती. गावाने, शेतकऱ्यांनी आणि प्रशासनाने हा सेतू बांधला, तरच शाश्वततेचा मार्ग रुंदावेल.

**बैलपोळ्याच्या शुभेच्छांचा अर्थ**

बैल दिसत नाही आणि पोळ्याच्या शुभेच्छा मात्र खचाखच हे विरोधाभास आपल्याला टोचायला हवेत. शुभेच्छा शब्दांत दिल्या तर त्या क्षणभर फुलतात; कृतीत उतरल्या तर पिढ्यान्पिढ्या सुगंध टिकवतात. त्यामुळे,

बैल वाचवा मोहीम, बैल जगवा मोहीम, बैल वाढवा मोहीम... या तीन प्रवासांना आपण प्रत्येक गावात, प्रत्येक शिवारात, प्रत्येक गोठ्यात सुरूवात केली पाहिजे. बैल जगला, तर शेतकऱ्याचा आत्मविश्वास जगेल; शेतकरी जगला, तर या कृषिदेशाची कणखर पाठराखण जगेल.

**शेवटचा प्रश्न आणि उत्तर**

बैल हरवलेला असताना आपण पोळ्याच्या शुभेच्छा द्यायच्या तरी कशा? उत्तर सरळ आहे. शुभेच्छा कृतीत रूपांतरित करा.

गावोगाव बैल-निधी उभारा.

गायवाडे पुनरुज्जीवित करा.

सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण नियमित घ्या..

प्रशासनासोबत नीती-संवाद साधा.

आजपासूनच एका बैलाची काळजी, एका गोठ्याची स्वच्छता, एका शिवारातली नैसर्गिक खताची रेघ ही छोटी पावलं उद्याच्या मोठ्या बदलाची पायरी ठरू शकतात.

## दहीहंडीः उत्सव की राजकारण? अमरावती जिल्ह्यातील बदलते स्वरूप

महाराष्ट्रात सर्वाधिक उत्साहाने साजरा केला जाणारा उत्सव म्हणजे दहीहंडी.



विशेषतः तरुणाईसाठी हा एक आनंदाचा, उत्साहाचा आणि एकजुटीचा उत्सव मानला जातो. पण अलीकडच्या काही वर्षांत अमरावती जिल्ह्यात हा उत्सव राजकारणाच्या विळख्यात सापडलेला दिसतो. केवळ सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा भाग राहिलेला दहीहंडी उत्सव आता हळूहळू राजकीय शक्तिप्रदर्शनाचे साधन बनत आहे.

पूर्वी दहीहंडी ही गावातील किंवा परिसरातील तरुण मंडळांनी एकत्र येऊन साजरी केली जात असे. यात स्पर्धा असली, तरी ती उत्सवाच्या आनंदासाठी होती. लोक आपापल्या परीने मदत करत, योगदान देत, आणि हा दिवस आनंदात साजरा करत. मात्र आता चित्र पूर्ण बदलले आहे. राजकीय नेत्यांच्या हस्ते उद्घाटने, मोठमोठे बॅनर, लक्षवेधी रोख बक्षिसांची घोषणा, आणि राजकीय वक्तव्ये हे सर्व या उत्सवात स्थान घेऊ लागले आहे.



बादल डकरे
९९७५८४४६३८

अमरावती जिल्ह्यातील अनेक भागांत दहीहंडी आयोजक मंडळे ही थेट राजकीय पक्षांशी संबंधित असलेली असतात. परिणामी, कार्यक्रमात त्या पक्षाचे नेते, आमदार, खासदार यांची उपस्थिती अनिवार्य बनते. त्यांच्या भाषणांमध्ये अनेकदा विरोधकांवर टीका केली जाते. सामाजिक एकजुटीचा आणि आनंदाचा उत्सव राजकीय कुरघोड्यांचा मंच बनतो. या प्रकारामुळे उत्सवाचा मूळ उद्देश आणि भावना कुठेतरी हरवताना दिसतात.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्पर्धेतील बक्षिसांची रक्कम. राजकीय ताकद दर्शविण्यासाठी लाखो रुपयांची बक्षिसे जाहीर केली जातात. परिणामी, अनेकदा तरुणांचे जीव धोक्यात येतात. सुरक्षा नियम पाळले जात नाहीत. फक्त प्रसिद्धी आणि राजकीय फायदा मिळवण्यासाठी असुरक्षितता वाढलेली दिसते.

राजकारणामुळे अनेकदा सामाजिक तेढ निर्माण होते. एका पक्षाचे आयोजन असल्याने दुसऱ्या पक्षाच्या समर्थकांमध्ये नाराजी निर्माण होते. कधी कधी तर यातून वाद, गोंधळ आणि पोलिस हस्तक्षेपाची वेळ येते. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अपमान होतो.

अर्थात, राजकीय सहभाग संपूर्णपणे नाकारता येणार नाही. जर राजकीय व्यक्ती आपल्या सामाजिक जबाबदारीतून या उत्सवाला सहाय्य करत असतील, तर त्याचे स्वागतच करावे लागेल. मात्र त्याचा उपयोग प्रसिद्धीसाठी, विरोधकांची बदनामी करण्यासाठी किंवा निवडणुकीपूर्वी मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी केला जात असेल, तर ती बाब चिंताजनक ठरते. दहीहंडी हा एक सांस्कृतिक ठेवा आहे. त्याचे रूपांतर राजकीय रंगमंचात होऊ नये. उत्सवाचा मूळ हेतू ह्र सामूहिक आनंद, एकजूट, आणि पारंपरिक कलेचे जतन याला पुढे नेणे हीच खरी गरज आहे. अमरावती जिल्ह्यातील आयोजकांनी आणि स्थानिक नागरिकांनी या विषयावर जागरूक राहून, उत्सवाला पुन्हा त्याच्या मूळ स्वरूपात आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

■ ■ ■




## बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा

बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय आणि ही कृतज्ञता या पोळा सणाच्या निमित्ताने आम्ही भारतीय सातत्याने जोपासत आलेलो आहोत. भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमात्रांची देखील पूजा करायला शिकवते. अलीकडे खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या आडून पशुपालकांसह शेती करणारा शेतकरीवर्ग हा देशोधडीला लागलेला आहे, याची जाण शासनानी ठेवली पाहिजे. त्यातूनच त्याची दिवसेंदिवस होत असलेली कुचंबना व आत्महत्या ही योग्य नाही. जर जगवणाराच जर जगला नाही, तर एक दिवस स्वदेशीचा ठेंभा मिरवणाऱ्या भारतीयांना विदेशी अन्नाशिवाय जगणे कठिण होऊन बसेल हे विसरता येणार नाही.

------------------

पोळा हा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्याच्या दिवशी येतो या महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौदर्यही खुलून दिसते. अशा या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांनंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण.

संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे पोळा. शेतकरी बांधवांसाठी पोळा या सणाचे महत्व खूप आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे. या दिवशी वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते.

या सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेतीत मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. त्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

ज्यांच्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात. बैलपोळ्याचा सण हा शेतीवर आधारित आहे व हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्यांच्या कामी येणाऱ्या प्राण्यांचे महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणांस करवून देतो. पोळ्याच्या काळात शेतकरी शेतात बैल पाळत नाहीत आणि त्या दिवशी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शाळांना सुट्टी असते.

फार प्राचीन परंपरेतील विशेषतः पशुपालक शेतकरी वगार्ने हजारो वषार्पासून जोपासलेला पोळा हा सण. पशुपालन अवस्थे नंतर कृषक अवस्थेत आलेल्या प्राचीन मानव समूदायाचा हा सण. भूमी आणि भाकरीसाठी राबराब राबणाऱ्या श्रमसंस्कृतीचे ते प्रतीक आहे. शेतकरी व शेतमजूराचा सच्चा साथीदार म्हणजे बैल. हे तिन्ही घटकांची परस्पर पुरकता ही अन्नासह अर्थार्जन निर्मितीसाठी देशाचा मूख्य आधारस्तंभ ठरते.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणाच्या दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते व त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात.

या वेळेस झडत्या म्हणायची पद्धत आहे, त्यानंतर मानवाईक ज्याला गावात मान आहे ती व्यक्ति, गावचा पाटील किंवा श्रीमंत जमीनदार तोरण तोडतो व पोळा फुटतो नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास बोजारा देण्यात येतो, शेतकरी वर्गात हा सण महत्त्वाचा मानला गेल्याने या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण असते.

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते.

गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देतो. या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात. या दिवशी शेतकरी आणि त्यांचे कुटुंब बैलांना धुणे, शिंगे रंगवणे, जुने दोर बदलून नवीन बांधणे, नवीन घंटा बांधणे आणि त्याचा साजशृंगार करतात. यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते.

या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने किंवा तेलाने शेकतात. याला खांद शेकणे अथवा खांड शेकणे म्हणतात. बैलाच्या पाठीवर नक्षीकाम केलेली पाठीवर घालायची झुल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे व करदोड्याचे तोडे घालुन त्याला खायला सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. काही ठिकाणी बाजरीची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते.

सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतो, म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही. यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात.

ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात व बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. बैलाची निगा राखणाऱ्या बैलकरी घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.

जेव्हा कोणताच धर्म अस्तित्वात आलेला नव्हता तेव्हा पासूनच प्राचीन भारतीय मानव समुदायाने बैलपूजनाची परंपरा जोपासलेली होती हे सिंधू संस्कृतीतील उत्खननातून सिद्ध झालेले आहे. बैल हे श्रमाचे प्रतीक, त्याच्याकडून वर्षभर काम करून घेत असतांना त्याच्या या ऋणाईतून उत्तराई होण्याचा हा दिवस म्हणून पोळा हा सण साजरा करण्याची ही प्रथा ग्रामीण जीवनात कायम आहे.

अलीकडे जरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे केली जात असली तरी बैलाचे महत्त्व जनमानसात आजही कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्यांचा सखा बणून राहणाऱ्या या बैलांच्या अपार श्रमातून देशातील तमाम मानवास रोजगार, अन्नधान्य व भोजन मिळते. परंतु या सणानिमित्त पळस या झाडांच्या फांद्या दारासमोर, गोठ्यात, शेतात ठेवण्याचीही परंपरा असल्यामुळे लाखो झाडांची तोड या दिवसावर होते.

अवकाळी पाऊस, दुष्काळ या निसर्गाच्या लहरीपणातून शेतकरी व पशुपालकांचा जीव आधीच मेटाकुटीला आलेला असतांना त्यात अशा सणोत्सवाच्या निमित्ताने होणारी वृक्ष तोड योग्य नाही, पर्यावरणाचा ऱ्हास करणारी ही पळस तोड थांबायला हवी. रक्ताचे पाणी करणारा शेतकरी आत्महत्या करतो, उपाशी झोपतो तर या मंदीरात देव-धमार्चे अवडंबर माजवणारा पुजारी, पुरोहित, पंडीत चैनीने तुपाशी खातो हे वास्तव म्हणजे या देशाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

या देशात गाय ही गोमाता ठरवली जाते, परंतू बैल पिता ठरत नाही. मदिरात मात्र दान-दक्षिणा ऐटण्यासाठी गोमाता नव्हे तर नंदी बैलाचीच प्रतीकृती हवी असते ही विसंगती जोपासणारेच जर संस्कृती व धर्मरक्षक बणून मानवाच्याच जीवावर उठत असेल तर आमच्या धडावर आमचेच डोके व आमचाच मेंदू असल्याशिवाय खरी संस्कृती व खरा धर्म याची सत्यता कळणार नाही. कष्टाशिवाय व्यक्तीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही, सर्वांना बैल पोळ्याच्या शुभेच्छा !

## सीएसडीएसचे संजयकुमार प्रमाणे
# निवडणूक आयोगावरही गुन्हा दाखल करणार का?

### नाना पटोलेंचा सवाल



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :
निवडणूक विश्लेषक आणि लोकनीती-सीएसडीएसचे (सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज) समन्वयक संजयकुमार यांनी जुने ट्विट डिलिट करून माफी मागितली. त्यानंतर त्यांच्यावर नागपूर आणि नाशिकमध्ये गुन्हा दाखल झाला आहे.

चुकीची माहिती ट्विट टाकल्याप्रकरणी गुन्हा होत असेल तर निवडणूक आयोगाने सुद्धा चुकीचे ट्विट केले आहे, त्यामुळे त्यांच्याविरुद्ध गुन्हे दखल झाले पाहिजे, असे अशी मागणी काँग्रेस नेते व माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरूवारी येथे केली. ते पत्रकारांशी बोलत होते.

संजय कुमार यांच्यावर गुन्हा दाखल होत असेल, तर केंद्रीय निवडणूक आयोग आणि तत्कालीन निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याही विरोधात गुन्हे दाखल झाले पाहिजेत.

संजय कुमार यांनी आपल्या डिलीट केलेल्या ट्विटमध्ये महाराष्ट्रातील रामटेक विधानसभा मतदारसंघ क्रमांक ५९ मध्ये लोकसभा निवडणुकीदरम्यान ४,६६,२०३ मतदार होते, तर विधानसभा निवडणुकीत ही संख्या २,८६,९३१ वर आली, म्हणजेच ३८ टक्के मतदार कमी झाले. तसेच, देवळाली विधानसभा मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत ४,५६,०७२ मतदार होते, तर विधानसभा निवडणुकीत ही संख्या २,८८,१४१ इतकी झाली. म्हणजेच ३६ टक्के मतदार कमी झाले.

या आकडेवारीचा आधार घेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतदार यादीत गडबड झाल्याचा आरोप केला होता.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सातत्याने मतचोरीचा आरोप करत आहेत. त्यासाठी त्यांनी निवडणूक आयोगालाच धारेवर धरले आहे. आयोग भाजपच्या प्रवक्त्याचे काम करीत असल्याचा त्यांचा आरोप आहे.

यात संजय कुमार यांनी चुकीचा डेटा दिल्याने त्यांच्यावर निवडणूक आयोगाच्या वतीने गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या आरोपांना आणखी बळ मिळाले आहे. हीच संधी साधून काँग्रेस नेते नाना पटोले यांनी निवडणूक आयोग आणि त्यांच्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले पाहिजेत, अशी मागणी केली आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत बोगस मतदान झाल्याची आम्ही सातत्याने तक्रारी करत आहोत. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यानच्या पाच महिन्यांत लाखो मतदारांची वाढ कशी झाली, याची विचारणा करत आहोत. सायंकाळी ५ वाजेनंतर १५ ते २० टक्के मतदान झाले, याचे सीसीटीव्ही फुटेज आम्ही मागत आहोत. मात्र ते दिले जात नाही. निकालानंतरही दोन तीन वेळा मतदानाची टक्केवारी बदलण्यात आली आहे, असे सांगून नाना पटोले यांनी निवडणूक आयोगाचा कारभार बोगस असल्याचा आरोप केला.

# एकही बिल थकवणार नाही...

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची ग्वाही




■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २१ :
जिल्हा दौऱ्यावर असलेल्या पवारांनी अधिकारी बैठक शांततेत आटोपली तर पत्रकार परिषद गाजवून सोडली. प्रश्न काय विचारायचे याचेही भान तुम्हास नाही कां, तुमचा अभ्यास काय असे प्रश्न बाहेरून आलेल्या पत्रकारांना करीत दादांनी जिल्ह्यात काय यावर बोला असे हौशीना सुनावले. पुढे आलेला प्रत्येक प्रश्न आणि त्यावर दादांचा प्रतिप्रश्न असेच चालले.

राज्यभरातील कंत्राटदारांच्या रखडलेलया बिलाविषयी अजितदादा म्हणाले की चिंता नको. कालच मी या विषयावर चर्चा केली. सचिव मनिषा म्हैसकर व अन्य अधिकाऱ्यांशी बैठक घेतली. साडे सात हजार कोटी तरतूद होईल. थकीत बिल राहणार नाही. एक वित्तमंत्री म्हणून मी ग्वाही देतो.

पुढे जिल्ह्यातील दारूबंदीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यावर बोलतांना अजितदादा यांनी खणखणीत स्वरात भूमिका मांडतांना स्पष्ट केले की भलेही महसूल बुडाला तरी बेहत्तर पण दारूबंदी उठणार नाहीच. हा गांधी जिल्हा वारसा ठेवून आहे. म्हणून बंदी. काही अवैध विक्रीने प्रश्न निर्माण होत असतील तर त्यावर पोलीस विभागाशी चर्चा करून उपाय करू.

जिल्ह्यात काही उद्योग लावण्यास पर्यावरण हेतूने अडचणी असतील. पण कापूस प्रक्रिया उद्योग सारखे ईथे लावता येतील, यावर चर्चा झाली आहे. सेवाग्राम विकास आराखडा आता या वर्षी नव्याने मान्यता घेत सुधारित स्वरूपात येईल.

देवळीचे आमदार राजेश बकाने यांनी काही सूचना केल्या. त्या योग्य वाटल्याने त्याचा समावेश या सुधारित आराखड्यात केल्या जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

हिंगणघाट येथील पालिका कार्यक्रमात खासदार अमर काळे यांनी पालकमंत्री ( डॉ. पंकज भोयर ) आमच्या कामास निधी देत नसल्याचा आरोप करीत आंदोलन करणार असल्याचा इशारा भाजप आमदार समीर कुणावार यांच्या उपस्थितीत देऊन चुकले आहे.

त्यावर दादांनी थेट प्रश्न केला, जिल्हा नियोजन मंडळ कश्यासाठी हो.

आमदार खासदार असे उत्तर दिल्यावर ते म्हणाले की हा विकास निधी विनियोग आमदारांच्या शिफारसीने होणार. राज्याच्या विकासाचा प्रश्न आहे. खासदारांनी केंद्राच्या निधीवर बोलावे. त्यासाठी जिल्हा दक्षता समिती असते. जिल्हा नियोजन मंडळात आमदार सांगणार तेच होणार. खासदार इशारा देत असतील तर त्यांनी त्यांचे अधिकार समजून घेतले पाहिजे असा टोला अजितदादा पवार यांनी खासदार अमर काळे यांना लगावला.

बिनफुकाचा ईशारा काय कामाचा असे त्यांनी म्हणताच आमदार कुणावार यांना हसू आवरले नाही. दादांना एक प्रश्न आल्यावर जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी दिलेली माहिती चांगलीच उपयुक्त ठरली.

# रोहित पवारांना दिलासा



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :
राज्य सहकारी बँक घोटाळाप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना 'पीएमएलए' कोर्टाने दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. आज या प्रकरणी सुनावणी पार पडली. या प्रकरणी आपल्यावर राजकीय दबावातून कारवाई सुरू असल्याचा आरोप रोहित पवारांनी केला.

रोहित पवार म्हणाले की, मी सरकारविरोधात बोलतोय म्हणून कारवाई केली जातेय. एफआयआरमध्ये अजित पवार, हसन मुश्रीफ यांच्यासह ७५ नेत्यांची नावे आहेत. मात्र, ते निवांत कसे, असा सवालही त्यांनी केला.

# अनिल धानोरकरांनी हाती घेतले कमळ

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २१ :
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत, तसतशा राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. काही नेते इतर पक्षांतील नेत्यांना आपल्या पक्षात सामील करून घेत आहेत, तर काही स्वेच्छेने पक्ष सोडत आहेत. याच पार्श्वभूमीवर चंद्रपूरमध्ये शिवसेनेला धक्का बसला आहे.

काँग्रेसच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांचे दीर अनिल धानोरकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्यासोबत शिवसेनेच्या १० नगरसेवकांनीही भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे, आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. या प्रवेशामुळे चंद्रपूरमधील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत.

अनिल धानोरकर यांच्या भाजप प्रवेशामुळे भद्रावती नगरपालिकेचे राजकारण बदलण्याची शक्यता आहे. आतापर्यंत भद्रावती पालिकेवर शिवसेना ठाकरे गटाचे वर्चस्व होते, पण अनिल धानोरकर आणि त्यांच्यासोबत १० नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने हे वर्चस्व धोक्यात आले आहे. यामुळे धानोरकर कुटुंबात राजकीय फूट पडल्याचे स्पष्ट झाले आहे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भद्रावतीमध्ये नव्या राजकीय समीकरणांचा उदय होण्याची शक्यता आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांच्या उपस्थितीत अनिल धानोरकर यांनी पक्षप्रवेश केला. कौटुंबिक वाद आणि राजकीय पुनर्वसन अशा सर्व घडामोडींनंतर अनिल धानोरकर यांनी ठाकरे गटाला पूर्णविराम देत अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला.

## मोलमजुरी करणाऱ्या आई-वडिलांची मुलगी
# अमिषा होणार डॉक्टर!



■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २१ :
मुलगी शिकली तर प्रगती होईल हा सावित्रीबाई फुले यांचा विचार आजही ग्रामीण भागात नवा उत्साह देतो. त्याच विचाराचं जिवंत उदाहरण म्हणजे नागपूर जिल्ह्यातील निमखेडा गावची अमिषा.

आई-वडील मजुरी करून कसाबसा संसार चालवत होते. दोन वेळचं पोटभर जेवण मिळणंही कधी कठीण जायचं. पण त्यांच्या मुलीने डॉक्टर व्हावं, हे स्वप्न आईच्या डोळ्यांत कायम होते. अमिषाने शिक्षणाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निमखेडा येथून केली. लहानपणापासूनच अभ्यासात हुशार असलेल्या अमिषाने पुढे गावातीलच साईबाबा विद्यालयातून दहावीपर्यंत शिक्षण घेतलं आणि तब्बल ८४ टक्के गुण मिळवले.

तेव्हा सगळ्यांना वाटलं, मुलगी नर्सिंगकडे वळेल. पण तिच्या मोठ्या बहिणीने आणि मेव्हण्याने तिच्या डोळ्यांत डॉक्टर होण्याचं स्वप्न जागवलं. त्यांनी ठाम सांगितलं, तुझ्यात प्रतिभा आहे, तू नक्की डॉक्टर होऊ शकतेस. दहावीच्या परीक्षेनंतर कोरोनाचा काळ आला. बहिणीचा नवरा सरकारी नोकरीत असल्यामुळे सोलापूरला बदली झाली आणि अमिषाही तिच्याकडेच राहायला गेली. तिथल्या संगमेश्वर महाविद्यालयात बारावीत प्रवेश घेतला. अपार मेहनतीनं तिने बारावीत ७६ टक्के गुण मिळवले.

यानंतर नीट परीक्षेची तयारी सुरू झाली. पण पहिल्याच प्रयत्नात अपयश आलं. क्षणभर मन खचलं. काही नातेवाईक आणि लोकांनी टोमणे मारले...हे आपल्याला नाही जमत, बी. एससी. कर आणि आई-बाबांना कामात मदत कर, गरीब घरचं मूल डॉक्टर होऊ शकत नाही. पण बहिणीच्या आधाराने अमिषा पुन्हा उभी राहिली. तिने ठामपणे ठरवलं, मी मागे हटणार नाही, डॉक्टर होणं हेच माझं ध्येय आहे.

दरम्यान मेव्हण्याची बदली पुन्हा नागपूरला झाली. तिथे राहून अमिषाने स्वतःला पुन्हा अभ्यासात झोकून दिलो. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करणारी तिची जिद्द पाहून शिक्षकांनीही तिला पाठींबा दिला. अखेर २०२५ मध्ये तिचं स्वप्न फळाला आलं. अमिषाचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस साठी प्रवेश झाला.

आज तिच्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आहेत. मजुरी करणारे ते हात अभिमानाने म्हणतात...आता आपली मुलगी पांढऱ्या कोटात लोकांची सेवा करणार!

अमिषाची कहाणी म्हणजे केवळ एका मुलीचं यश नाही. ती सावित्रीबाईंच्या विचारांची पुष्टी आहे. शिक्षण, मेहनत आणि जिद्द असेल तर छोट्या खेड्यातील मुलगीही मोठी स्वप्नं पूर्ण करू शकते, हे अमिषाने आपल्या जिद्दीने जगाला दाखवून दिलं आहे.

लोकरंजन

# प्रिया बापट पहिल्यांदाच झळकणार पोलिसाच्या भूमिकेत

मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी, अभिनयाच्या विविध छटांमध्ये रसिकांची मनं जिंकणारी प्रिया बापट आता एका नव्या आणि थरारक अविष्कारात दिसणार आहे.

अमेझॉन प्राईमवर लवकरच प्रदर्शित होणाऱ्या अंधेरा या हॉरर सिरीजमध्ये ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या सिरीजचा ट्रेलर सोशल मीडियावर झळकला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये एकाच वेळी भीती आणि उत्सुकता निर्माण केली आहे. या सिरीजमधून प्रियाने हॉरर जॉनरमध्ये पदार्पण केले असून यात ती पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारत आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांसाठी ही एक आनंदाची बाब आहे.




या अनुभवाबद्दल प्रिया बापट म्हणते, "मी पहिल्यांदाच हॉरर जॉनरमध्ये काम करतेय आणि हा अनुभव खरोखरच वेगळा ठरला. खूप नाईट शिफ्ट्समध्ये शूटिंग केलं, परंतु स्क्रिप्ट इतकी इंटरेस्टिंग होती की, काम करताना काहीच जाणवले नाही. जेव्हा हे स्क्रिप्ट मला मिळालं, तेव्हा वाचून एकच विचार मनात आला, तो म्हणजे सध्या वाचलेल्या स्क्रिप्ट्सपैकी हे सर्वात उत्तम होतं.

ही कथा फार वेगवेगळ्या पद्धतीने उलगडते आणि म्हणूनच ती अभिनयाच्या दृष्टीने खूपच आव्हानात्मक ठरली. यात ॲक्शन सिक्वेन्सेस आहेत, भीतीदायक हॉरर सीन आहेत. त्यामुळे कलाकार म्हणून ही भूमिका करताना एक वेगळीच मजा आली. आतापर्यंत मी राजकारणी, वकील यांसारख्या विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, या सिरीजमध्ये मी एका पूर्णतः वेगळ्या प्रोफेशनमधून प्रेक्षकांसमोर येणार आहे.

अंधेराचं ट्रेलर पाहून प्रेक्षकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कथानक काय आहे? हे रहस्य नेमकं कुठं घेऊन जाणार आहे? मात्र या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत, परंतु तोपर्यंत अंधेराची ही थरारक झलक आणि प्रिया बापटचं हॉरर शैलीतील पदार्पण यामुळे ही सिरीज चर्चेचा विषय ठरली आहे.

■ ■ ■

# दशावतार चित्रपटाचं ट्रेलर प्रदर्शित




'दशावतार' चित्रपटाचं पोस्टर, त्याचा पहिला लूक आणि चित्रपटातील पहिलंच गाणं आवशीचो घो यांनी आधीच रसिकांच्या मनात तुफान उत्सुकता निर्माण केली.

प्रेक्षकांची ही उत्कंठा शिगेला पोहोचली असतानाच दशावतार या चित्रपटाचा भव्य ट्रेलर एका शानदार समारंभात नुकताच प्रदर्शित करण्यात आला. झी स्टुडिओजची प्रस्तुती, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊसची निर्मिती असलेला दशावतार चित्रपट मराठी चित्रसृष्टीत एक नवी झळाळी घेऊन अवतरत आहे. महाराष्ट्रात आणि विशेषतः कोकणात गणेशोत्सवाचं महत्त्व सर्वाधिक आहे. या गणेशोत्सवाप्रमाणेच कोकणात दशावतार ही कलापरंपरा तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच येत्या गणेशोत्सवाच्या पाठोपाठ अवघ्या महाराष्ट्रात दशावतारचं मोठ्या दिमाखात आगमन होत आहे.

ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, प्रियदर्शिनी इंदलकर अशी मराठी चित्रपटातील कलाकारांची फौज असलेला हा मल्टीस्टारर दशावतार दशावतारमध्ये नेमकं आहे तरी काय, याची सर्वांनाच उत्कंठा आहे. कोकणातील इरसाल माणसांचे नमुने , तिथल्या प्रथा परंपरा, दशावतारी नाट्यकला यांचा सुरेख मिलाफ म्हणजे दशावतार ! कोकणातील समृद्ध निसर्गवैभव, गर्द देवराया, देवरायांचे राखणदार यांची गूढरम्यता म्हणजे दशावतार! कलासक्त वृद्ध दशावतारी बाबुली मेस्त्री आणि त्याच्या आयुष्यातल्या वादळांची गोष्ट म्हणजे दशावतार आहे!! अर्थपूर्ण कथा, दमदार अभिनय आणि कर्णमधूर संगीत यांचा अप्रतिम संगम म्हणजेच हा दशावतार ! असा हा कलात्मक आणि तांत्रिक दृष्ट्या भव्य अनुभूती देणारा दशावतार येत्या १२ सप्टेंबरपासून मोठ्या पडद्यावर अत्यंत दिमाखात रूजू होतोय.

■ ■ ■

गणेशोत्सवाला भक्तीचा नवा स्वर देणारं गाणं शंकराचा बाळ आला लवकरच श्री गणेशाचे आगमन होणार आहे. सध्या सर्वत्र चैतन्यमय वातावरण असताना, याच उत्साहात आणि भक्तीभावात वैशाली माडे प्रस्तुत, पीसफुल बिट्स प्रॉडक्शन्स निर्मित शंकराचा बाळ आला हे श्रीगणेश गीत रसिकांच्या भेटीला आलं आहे. वैशाली माडे यांच्या भावपूर्ण आणि सुरेल आवाजातील या गीताला मंदार चोळकर यांनी काव्याची ओजस्वी शब्दरचना दिली असून, वरुण लिखाते यांचे सुंदर संगीत याला लाभले आहे. या गाण्यातील कलाकारांनीही आपल्या अभिनयाने गीताला चारचाँद लावले आहेत.

या गाण्यात निसर्गरम्य कोकणात उत्साहाने साजरा होणारा गणेशोत्सव उलगडतो. मात्र हे केवळ एक गाणं नसून त्यातून एक हृदयस्पर्शी कथा सांगितली जाते ह्र एका आईची, जी सैनिक आहे. गणेशोत्सवासाठी घरी आलेली ही आई बाप्पाची सेवा करून, नंतर पुन्हा देशसेवेसाठी निघते. भक्ती, कुटुंब आणि देशभक्ती यांचा अनोखा संगम या कथेतून आणि दृश्यातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो.गीतामधील योगिता चव्हाण यांचा भावपूर्ण चेहराभाव, अभिजीत केळकर यांची उत्सवी ऊर्जा आणि आरव आयेरचा निरागस आनंद प्रत्येकाला आपल्या घरच्या गणेशोत्सवाची आठवण करून देणारा आहे. गणेशोत्सव हा फक्त सण नसून भावनांचा, परंपरेचा आणि भक्तीचा अविष्कार आहे. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या सजावटीत, आरत्या आणि प्रसादाच्या सुवासात दडलेले वातावरण हे प्रत्येकाच्या मनात आनंद आणि श्रद्धेची लहर निर्माण करते. ह्रशंकराचा बाळ आला हे गाणं या उत्सवात चैतन्याची, भक्तीभावाची आणि देशभक्तीची आणखी एक सुंदर भर घालणार आहे.




■ ■ ■

# तुझ्यासाठी तुझ्यासंग मध्ये सीमा घोगळे यांची नवी भूमिका



'सन मराठी' वरील तुझ्यासाठी तुझ्यासंग ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. सध्या मालिकेत माईसाहेब वैदहीचा बदला घेण्यासाठी वेगवेगळे प्लॅन तयार करतात. पण तेजा कायम वैदहीच्या बाजूने खंबीर उभा राहतो. माईसाहेबांसह मालिकेत अभिनेत्री सीमा घोगळे 'पुष्पा' ही खलनायिकेची भूमिका साकारत आहेत.

भूमिकेबद्दल सीमा घोगळे म्हणाल्या की, यापूर्वी बरेचदा खलनायिकेची भूमिका साकारली आहे, पण 'पुष्पा' भूमिकेत बऱ्याच वेगवेगळ्या छटा आहेत. त्यामुळे ही भूमिका साकारताना दडपण येतं पण दिग्दर्शकांच्या मार्गदर्शनामुळे पुष्पा साकारणं सोपं होतंय. मला या रूपात पाहून प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया काय असतील? याकडे माझं लक्ष आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# नीतेश राणेंना पूर्वजांचा विसर नाही

### वराह जयंतीच्या मागणीवर अंधारेंची बोचरी टीका



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २१ :
नीतेश राणेंना आपल्या पूर्वजांचा विसर पडला नाही, त्यांनी वराह जयंतीच्या दिवशी वराह अवतारामध्ये जयंती साजरी करावी, असे म्हणत उबाठाच्या उपनेत्या सुषमा अंधारे त्यांना टोला लगावला आहे. नीतेश राणेंनी २५ ऑगस्ट रोजी वराह जयंती राज्यभरात साजरी करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली यावर अंधारे यांनी निशाणा साधला आहे.

सुषमा अंधारे म्हणाल्या की, नीतेश राणे कायम बडबडत असले तरी कधीकधी त्यांची विधाने अत्यंत महत्त्वाची असतात आणि ती गांभीर्याने घेतली पाहिजे. वराह जयंतीच्या निमित्ताने त्यांनी केलेले विधान फार महत्त्वाचे आहे. त्यांनी केलेले आवाहन की आपण वराह जयंती साजरी केली पाहिजे हे सुद्धा अत्यंत महत्त्वाचे आहे. नीतेश राणे यांना आपल्या पूर्वजांचा विसर पडलेला नाही. ते हा सर्व उत्सव साजरा करु इच्छितात ही अगदी चांगली गोष्ट आहे. नीतेश राणे आणि त्यांच्या समर्थकांनी एक संपूर्ण दिवस वराह अवतारामध्ये काढायला हवा. वराह अवतारामध्ये जयंती साजरी केली तरच ही जयंती खऱ्या अर्थाने साजरी होईल, असा टोला अंधारेंनी लगावला.

## सप्टेंबरनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात
# अनेक मोठ्या घडामोडी

### दमानियांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २१ :
सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाबद्दल काही मोठे दावे केले आहेत. सत्ताधारी एनडीएमध्ये सध्या सर्वकाही सुरळीत नसल्याचे दिसत असून, त्याचा परिणाम महाराष्ट्रातील राजकारणावरही होईल, असे दमानिया यांनी म्हटले आहे. सध्याच्या घडामोडीत एकनाथ शिंदे यांचा भाव वाढेल परंतु सप्टेंबरनंतर काय होईल सांगता येत नाही, असेही त्या म्हणाल्या.

दमानिया म्हणाल्या की, उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपली ताकद दाखवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच ते कॅबिनेट बैठकीलाही गैरहजर होते, अशी चर्चा आहे. अंजली दमानिया यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या राजकीय भूमिकेवरही भाष्य केले. राज ठाकरे हे भविष्यात भाजपसोबतच जातील, असे स्पष्टपणे दिसत असल्याचे त्या म्हणाल्या.

# हैदराबादचा पर्यटक सिंहगडावर बेपत्ता

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २१ :
पुण्याजवळील प्रसिद्ध सिंहगड किल्ल्यावर एक घटना घडली आहे. हैदराबादहून आलेल्या एका पर्यटकाचा तानाजी कड्यावरून पाय घसरून तो खोल दरीत कोसळला. गौतम गायकवाड (२४) असे या तरुणाचे नाव आहे.

गौतम गायकवाड आपल्या चार मित्रांसह हैदराबादहून पुणे आणि आसपासच्या भागात फिरण्यासाठी आला होता. बुधवारी दुपारी साडेचार वाजता ते सर्व मित्र सिंहगड किल्ल्यावर पोहोचले. संध्याकाळच्या वेळी ते तानाजी कड्याच्या दिशेने गेले. तेव्हा गौतमने मित्रांना लघुशंकेसाठी जात असल्याचे सांगितले आणि तो पुढे गेला. मात्र बराच वेळ झाला तरी तो परत न आल्याने त्याच्या मित्रांनी त्याचा शोध सुरू केला. हवा पॉइंटजवळ त्याची चप्पल सापडली. दरीत कोसळून त्याचा मृत्यू झाला असावा, अशी शंका आहे.

# आपल्या बैलांवर लिहा, सातबारा कोरा-कोरा..!

### बच्चू कडूंनी दिला नारा

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २१ :
प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर, दिव्यांगांच्या प्रश्नांवर गेल्या काही महिन्यांपासून लढा पुकारला आहे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा, ही त्यांची प्रमुख मागणी आहे. त्यांनी अन्नत्याग आंदोलन, पदयात्रेच्या माध्यमातून या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. सरकारने आजवर आश्वासने दिली, पण प्रश्न सुटलेले नाहीत, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, येत्या २२ ऑगस्ट रोजी बैलपोळा हा सण साजरा केला जाणार आहे. शेतकऱ्यांसाठी हा महत्वाचा सण मानला जातो. पोळ्याच्या निमित्ताने बच्चू कडू यांनी नवीन घोषणा केली आहे. यंदाचा पोळा हा संघर्षाचा आणि कर्जमुक्तीचा पोळा आहे. या पोळ्याला शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या लढ्याला बळ देण्यासाठी आपल्या बैलांवर सातबारा कोरा-कोरा, शेतकरी कर्जमाफी हवीच, हे घोषवाक्य लिहण्याचे आवाहन बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांना केले आहे.

प्रत्येक गावात, प्रत्येक बैलाच्या जरीवर संघर्षाचा घोष लिहा, आपल्या गावातील सर्व नागरिक, कार्यकर्ते, शेतकरी यांच्याशी याबाबत चर्चा करा, या नव्या संकल्पनेला व्यापक रुप द्या, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी हाच खराखुरा संघर्षाचा पोळा राहणार असल्याचे बच्चू कडू म्हणाले.




शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी बच्चू कडू यांनी अमरावती आणि यवतमाळ जिल्ह्यात गेल्या महिन्यात १३८ किलोमीटरची पदयात्रा काढली होती. शिवसेना (उद्धव ठाकरे), मनसेसह विविध पक्षांनी या पदयात्रेला पाठिंबा दिला होता. बच्चू कडू यांनी ज्यावेळी अन्नत्याग आंदोलन केले होते.